




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ४५ * नांदेड * मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# ७५ शाळांना घाईघाईने अल्पसंख्यांक दर्जाची खिरापत

## अजितदादांच्या निधनाच्यादिवशी मंत्रालयात धक्कादायक प्रकार

**मुंबई (प्रतिनिधी)–** अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात शासकीय दुखवट्याचे वातावरण असतानाच अल्पसंख्याक विभागाकडून ७५ शिक्षण संस्थांना घाईघाईने अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर अवघ्या काही तासांतच ही प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात झाल्याचे उघड झाले आहे. मागील वर्षी ऑगस्ट महिन्यापासून अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्यास स्थगिती देण्यात आली होती. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर ही स्थगिती डावलून मंत्रालयातून गुपचूपपणे प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, पहिले प्रमाणपत्र २८ जानेवारी रोजी, अजित पवार यांच्या अपघाताच्या दिवशीच दुपारी ३ वाजून ९ मिनिटांनी देण्यात आले. राज्यात शासकीय दुखवटा सुरू असताना मंत्रालयात ही प्रक्रिया कशी आणि कोणाच्या आदेशाने राबवली गेली, असा सवाल उपस्थित होत आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर घाईघाईने प्रमाणपत्रे देण्यात आल्याने यामागे मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन यांनी केला आहे. अल्पसंख्याक विभागातील या कथित गैरकारभाराविरोधात त्यांनी उघडपणे आवाज उठवला आहे.

अल्पसंख्यांक दर्जा देण्याची प्रक्रिया सध्या पैसे कमावण्याचा अड्डा बनली आहे, असा गंभीर आरोप करत प्यारेखान यांनी राज्यातील साडेआठ हजारांहून अधिक अल्पसंख्यांक शाळांची सखोल चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती दिली. दरम्यान, अकोला जिल्ह्यातील सलीम जखरिया उर्दू मिडल स्कूल, पातूर आणि सय्यद गफार सय्यद हुसेन मिडल स्कूल, पातूर या शाळांमध्ये गंभीर अनियमितता आढळून आल्याने त्यांचा अल्पसंख्यांक दर्जा रद्द करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहितीही प्यारेखान यांनी दिली आहे. या प्रकरणामुळे राज्याच्या प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, पुढील तपासात आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### राज्यभरातून संताप होताच मुख्यमंत्र्यांकडून स्थगिती

अजित दादांनी थांबवून ठेवलेल्या काही फाईल्सवर सुमारे ४ वाजताच्या सुमारास सह्या करण्यात आल्याचं प्रकरण उघडकीस आलं होतं. आता, याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. अजितदादांच्या निधनाच्या दिवशी अल्पसंख्याक विकास विभागाने ७५ शाळांना परस्परपणे अल्पसंख्यांक दर्जाचे प्रमाणपत्र वाटप केल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे. तसेच, संबंधित प्रमाणपत्रास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून स्थगिती देण्यात आली. तसेच, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून करा आणि दोषींवर कारवाई करा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत, अशी विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत

**मुंबई (प्रतिनिधी)–** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी एक दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर येत असून मोदींच्या दौऱ्यानिमित्त मुंबईतील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. पंतप्रधान आज १७ फेब्रुवारी रोजी दुपारी २.१५ वाजता मुंबईत येणार आहेत. त्यानंतर, दुपारी २.३० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्यात लोकभवन (यापूर्वीचे राजभवन) येथे द्विपक्षीय बैठक पार पडणार आहे. त्यानंतर, दुपारी ५ वाजता नरेंद्र मोदी आणि मॅक्रोन यांची हॉटेल ताज येथे विविध कंपन्यांच्या सीईओंसोबत राऊंडटेबल चर्चा होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुंबईतील वाहतुकीत बदल करण्यात आल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ६.३० वाजता मुंबईतील 'गेट वे ऑफ इंडिया' परिसरात इंडो-फ्रान्स सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# माजी आ. शंकरअण्णा धोंडगे समर्थकांसह शिवसेनेत

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत प्रवेश



**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कंधारचे माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांनी समर्थकांसह सोमवार, दि.१६ फेब्रुवारी रोजी शिवसेनेत प्रवेश केला. हा पक्ष प्रवेश मुंबई येथे झाला. यामुळे तेलंगणातील बीआरएसनंतर एमआरएसची स्थापना करून शंकरअण्णांनी अखेर धनुष्यबाण हाती घेतला आहे.

मुळ शेतकरी संघटनेचे नेते आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कंधारचे माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे २०२४ मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीपुर्वी बीआरएस पक्षात सामील झाले होते. मात्र बीआरएसच्या सपशेल पराभवामुळे गुलाबी वादळ शांत झाले. यानंतर अण्णांनी आपल्या नांदेडसह मराठवाडा व विदर्भातील काही भागातील पदाधिकाऱ्यांची मूठ बांधून एमआरएस या पक्षाची स्थापना केली. परंतु येथेही म्हणावे तसे यश मिळाले नाही. अखेर नव्या आधारस्तंभाचा शोध सुरू असताना काही दिवसांपासून शिवसेना पक्ष प्रवेशाची चर्चा सुरू झाली होती. ती सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी थांबली. शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे व त्यांच्या समर्थकांनी शिवसेनेत प्रवेश केला. मुंबई येथे झालेल्या सोहळयात अण्णांनी धनुष्यबाण हाती घेतले. यावेळी आ. बालाजी कल्याणकर, बालाजी खतगावकर यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

# पुन्हा एक मुख्याध्यापक लाचेच्या जाळ्यात

- सहकारी शिक्षकांकडून स्विकारली तीन हजारांची लाच
- एका महिन्यात एसीबीचा शिक्षकांवरील तिसरा ट्रॅप

**नांदेड (प्रतिनिधी)–** सहकारी शिक्षकाची अर्जित रजा मंजूर करण्यासाठी ३ हजार रुपयांची लाच स्वीकारणारा रिसनगाव जिल्हा परिषद शाळेतील केंद्रप्रमुख दिगंबर शिंदे हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला आहे. हा प्रकार सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी घडला. या प्रकरणी लोहा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्षकांवरील जिल्ह्यातील हा तिसरा सापळा असल्याने शिक्षण विभागाला भ्रष्टाचाराची कीड लागल्याचे बोलले जात आहे.

तक्रारदार दि. १२ फेब्रुवारी रोजी यांनी तक्रार दिली की, सन २०१८ पासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाद्रा, ता. लोहा, जि. नांदेड येथे प्राथमिक शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. तक्रारदारांनी त्यांच्या खासगी कारणास्तव दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी (४६) दिवसांची अर्जित रजा मंजूर होण्याकरिता गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय लोहा येथे अर्ज दिला होता.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रिसनगाव, ता. लोहा येथील केंद्रप्रमुख दिगंबर शिंदे हे पंचायत समिती लोहा कार्यालयाच्या आस्थापना विभागामध्ये लिपिकाचे काम तसेच गटशिक्षणाधिकारी व्यवहारे यांचे सर्व कार्यालयीन कामे पाहतात. त्यामुळे तक्रारदार हे दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी आपली अर्जित रजा मंजूर झाली की, नाही हे पाहण्यासाठी पंचायत समिती लोहा कार्यालयात गेले. केंद्र प्रमुख शिंदे यांची भेट घेऊन त्यांना अर्जित रजा मंजुरीविषयी विचारणा केली. तेव्हा शिंदे यांनी तक्रारदार यांना अर्जित रजा मंजूर करण्यासाठी केंद्र प्रमुख दिगंबर शिंदे हे आले व तुमची अर्जित रजा मंजूर करायची असेल तर मला दोन-तीन हजार रुपये देऊन टाका असे म्हणून लाचेची मागणी केली.

दि. १६ फेब्रुवारी रोजी ३ हजार रुपये लाच स्वीकारताना केंद्रप्रमुख शिंदे यांना रंगेहात पकडण्यात आले. पोलीस निरीक्षक अनिता चव्हाण यांच्या फिर्यादीवरून लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास एसीबीच्या पोलीस निरीक्षक अर्चना करपुडे करत आहेत.

# किनवट : अस्वलाच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या दुसऱ्या शेतकऱ्याचा बळी

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील दयालधानोरा शिवारात दि.१० फेब्रुवारी अस्वलाने केलेल्या प्राणघातक हल्ल्यात १ शेतकरी जागीच मृत्युमुखी पडला होता. तर ९ जण जखमी झाले होते. आता सोमवारी जखमी झालेल्या एका शेतकऱ्याचा मृत्यूशी झुंज देताना उपचारादरम्यान मृत्यू झाला.




दयालधानोरा शिवारात दि.१० फेब्रुवारी रोजीच्या रात्री पिकाला पाणी देत असताना शिवारात दबा धरून बसलेल्या अस्वलाने आधी दोघांवर व त्यानंतर त्यांच्या बचावासाठी आलेल्या अन्य ७ शेतकऱ्यांवर प्राणघातक हल्ला केला होता. या हल्ल्यात बळी दत्ता जाधव या शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला होता. या हल्ल्यातील गंभीर जखमी असलेल्या चंद्रसिंग शेषेराव राठोड (वय ४७) या शेतकऱ्याला छत्रपती संभाजीनगर येथे अधिक उपचारासाठी हलविण्यात आले होते. उपचारादरम्यान चंद्रसिंग राठोड यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मयत चंद्रसिंग राठोड यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुले, दोन भाऊ असा परिवार आहे. मयत चंद्रसिंग यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# किनवटमध्ये मोबाईल टॉवर बंद; इंटरनेट सेवा ठप्प, दोघांवर गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील किनवट परिसरात मोबाईल टॉवर बंद ठेवणे व उपकरणांची नासधूस केल्याच्या प्रकारामुळे जिओ मोबाईल व इंटरनेट सेवा मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली. या प्रकरणी पोलिसांनी रवी चव्हाण आणि मोहम्मद अजोरुद्दीन या दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

गुन्हा दाखल झालेले दोघेही प्रताप टेक्नॉक्रॅटस या कंपनीशी संबंधित आहेत. ही कंपनी विविध मोबाईल सेवा पुरवठादारांच्या टॉवर व फायबर नेटवर्कची देखभाल आणि दुरुस्तीचे काम करते. प्राप्त माहितीनुसार, काही कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन करत टॉवर बंद पाडणे तसेच फायबर लाईनचे



नुकसान केल्याचा आरोप केला. त्यामुळे किनवटसह मराठवाडा व विदर्भातील अनेक भागांतील जिओ ग्राहकांना कॉल व इंटरनेट सेवेत अडथळे निर्माण झाले. जिओ नेटवर्क ठप्प झाल्याने विद्यार्थी, ऑनलाइन व्यवहार करणारे नागरिक, व्यापारी तसेच शासकीय सेवांवर अवलंबून असलेल्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. मोबाईल व इंटरनेट सेवा या अत्यावश्यक सेवांमध्ये येतात. त्यामध्ये जाणूनबुजून अडथळा निर्माण करणे हा गंभीर प्रकार मानला जात आहे.

दरम्यान, संबंधित कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी कंपनीवर दबाव आणण्याच्या हेतूने हे कृत्य केल्याचा संशय व्यक्त केला जात असून, अशा प्रकारांविरोधात कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.

# कंधार तालुक्यातील अंबुलगा केंद्रावर जिल्हाधिकाऱ्यांची अचानक भेट

## परीक्षेतील अनियमिततेप्रकरणी कारणे दाखवा नोटीस



**नांदेड (प्रतिनिधी)–** इयत्ता बारावीच्या सुरू असलेल्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर सोमवारी भौतिकशास्त्र विषयाचा पेपर पार पडला. यानिमित्त जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कंधार तालुक्यातील अंबुलगा येथील माणिक प्रभु उच्च माध्यमिक विद्यालय या परीक्षा केंद्राला अचानक भेट दिली.

भेटीदरम्यान उरलेल्या प्रश्नपत्रिका मानक कार्यप्रणाली नुसार (एसओपी) सीसीटीव्हीच्या निगराणीखाली सुरक्षितरित्या जमा न केल्याची गंभीर त्रुटी आढळून आली. तसेच परीक्षेचे पर्यवेक्षण करणाऱ्या काही शिक्षकांनी आपले ओळखपत्र जवळ न ठेवल्याची बाबही निदर्शनास आली. या अनियमिततेसंदर्भात संबंधित केंद्रप्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आवश्यक ड्युअल डेस्कची व्यवस्था नसल्याचेही आढळून आले. ही बाब अत्यंत गंभीर असून, संबंधितांवर कडक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिल्या आहेत. तसेच संबंधित परीक्षा केंद्र रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.


जिल्ह्यात कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. अनेक संवेदनशील केंद्रांवर बैठे पथकांमार्फत निगराणी ठेवण्यात येत आहे. झूम वेबकास्टद्वारे संपूर्ण वेळ परीक्षेचे थेट नियंत्रण करण्यात येत असून त्यासाठी दोन स्वतंत्र नियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहेत. इयत्ता १२ वी व १० वीच्या परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी सीसीटीव्ही व ड्रोनच्या माध्यमातून चित्रीकरण करण्यात येत आहे.

### ड्रोन, व्हिडिओ कॅमेरे व झूम वेबकास्टद्वारे सर्व परीक्षा केंद्रावर कडेकोट नजर –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

इयत्ता १२ वीच्या सकाळ सत्रातील भौतिकशास्त्र विषयाचा पेपर सोमवारी जिल्ह्यात सुरळीत पार पडला. या दिवशी जिल्ह्यातील एकूण १०९ परीक्षा केंद्रांवर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे पूर्णवेळ परीक्षेचे नियंत्रण ठेवण्यात आले होते. ड्रोन व व्हिडिओ कॅमेऱ्यांच्या सहाय्यानेही केंद्रांवर बारकाईने नजर ठेवण्यात आली, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

# 'राष्ट्रवादी काँग्रेस'च्या अध्यक्षपदी सुनेत्रा पवार?

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या निवडीची तारीख ठरली असून २६ फेब्रुवारीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीची कार्यकारिणीची बैठक पार पडणार आहे. याच बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं जाईल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीवरुन दोन्ही राष्ट्रवादीतील पदाधिकारी आणि आमदार, खासदारांमध्ये काही प्रमाणात सुरू असलेल्या चर्चेला आता पूर्णविराम मिळणार आहे.




# पोक्सो प्रकरणात बिलोली पोलिसांची तत्परता; २४ तासांत आरोपी अटक करून दोषारोपत्र दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)–** बिलोली पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांनी एका अल्पवयीन मुलीला त्रास दिलेल्या प्रकरणात आरोपीला अटक करून २४ तासांत न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

दि. १२ फेब्रुवारी रोजी मध्यरात्रीनंतर ३ वाजता दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार एका टेलरने एका अल्पवयीन मुलीला आपल्याकडे बोलावले आणि तुझ्या आईचे कपडे घेवून जा असे सांगितले. ती मुलगी घरात आल्यावर दार आतून बंद केले. अल्पवयीन बालिकेला पलंगावर उभे करून तो दुसऱ्या रुममध्ये गेला. दरम्यान अल्पवयीन बालिका या सर्व प्रकाराला घाबरली आणि दारमधून बंद असलेले दार उघडून बाहेर पळत आली. बिलोली पोलीस उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक शाम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस अधिक्षक कमल शिंदे, पोलीस उपनिरिक्षक विजय पंतोजी, लोखंडे, पोलीस अंमलदार मुद्देमवार, अंभुरे, धुमपटवाड, कठारे, वनशेट्टे आदींनी या प्रकरणातील आरोपी आमन बहाउद्दीन काझी (वय २०) यास अटक करून २४ तासांच्या आत आरोपीसह दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# बांगलादेश सत्तांतर : 'शुभ वार्ता' की नवी कसोटी?

बांगलादेशातील अलीकडील संसदीय निवडणुकीत बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी अर्थात बीएनपीला मिळालेला स्पष्ट बहुमताचा कौल हा केवळ सत्तांतर नाही, तर दक्षिण आशियातील राजकारणात एक महत्त्वाचा वळणबिंदू मानला जात आहे. गेल्या अठरा महिन्यांपासून अस्थिरतेत अडकलेल्या बांगलादेशला या निकालाने नवी दिशा देण्याची शक्यता आहे. विशेषतः भारत–बांगलादेश संबंधांच्या संदर्भात हा निकाल 'शुभ वार्ता' ठरू शकतो, असे मत भारतीय राजनैतिक व सामरिक वर्तुळातून व्यक्त होत आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर शेख हसीना यांच्या दीर्घकालीन सत्तेचा अंत झाला. त्यानंतर बांगलादेशात निर्माण झालेली राजकीय पोकळी, कायदा–सुव्यवस्थेची ढासळलेली स्थिती, तसेच अल्पसंख्याकांवरील हल्ल्यांच्या घटनांनी देश अस्थिर झाला होता. अशा पार्श्वभूमीवर झालेल्या या निवडणुकीत जनतेने बीएनपीला स्पष्ट बहुमत देत लोकशाही प्रक्रियेवर विश्वास व्यक्त केला आहे. हा कौल केवळ सत्ताधाऱ्यांविरोधातील नाराजी नव्हे, तर स्थैर्य, सुरक्षितता आणि सर्वसमावेशकतेची अपेक्षा दर्शवणारा आहे. भारतीय राजकीय वर्तुळात या निकालाचे स्वागत होत आहे, याचे कारण उघड आहे. गेल्या काही काळात भारत–बांगलादेश संबंधांमध्ये तणाव वाढला होता. सीमासुरक्षा, घुसखोरी, अल्पसंख्याकांचे प्रश्न आणि प्रादेशिक राजकारण या मुद्द्यांवरून संबंधांवर सावट आले होते. बीएनपीचा विजय हे संबंध पूर्ववत करण्याची संधी देऊ शकतो, असा आशावाद माजी राजदूत व सामरिक तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. जनतेच्या भावना निकालातून स्पष्ट झाल्या आहेत, असे मत माजी परराष्ट्र सचिवांनी मांडले, हे या बदलत्या वातावरणाचे द्योतक आहे. या निवडणुकीत जमात–ए–इस्लामीसारख्या कट्टरतावादी शक्तींना अपेक्षित पाठिंबा न मिळणे, हा आणखी एक महत्त्वाचा संदेश आहे. यामुळे बांगलादेशातील लोकशाही मूल्यांना बळ मिळाले आहे. दीर्घकाळ राजकीय अस्थिरता आणि हिंसाचार अनुभवलेल्या देशासाठी ही निवडणूक स्थिरतेकडे नेणारे पाऊल ठरू शकते. अल्पसंख्याकांच्या सुरक्षेचा प्रश्नही या सत्तांतरामुळे ऐरणीवर आला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे या निवडणुकीत हिंदू उमेदवाराचा विजय झाला आहे. बीएनपीकडून महिलांना मिळालेली प्रतिनिधित्वाची संधी, हे सकारात्मक संकेत मानावे लागतील. तथापि, या विजयासोबतच काही आव्हानेही उभी राहिली आहेत. बीएनपीने सत्तेत येताच शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी पुन्हा ठामपणे मांडली आहे. हा मुद्दा भारतासाठी संवेदनशील ठरणार आहे. कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घ्यावा लागेल, अन्यथा द्विपक्षीय संबंधांवर ताण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवरही या निकालाकडे बारकाईने पाहिले जात आहे. चीनने या नव्या सरकारसोबत संबंध अधिक दृढ करण्याची तयारी दर्शवली आहे. यामागे त्यांचा स्वार्थ आहे हे तर उघडच. त्यासोबतच नापाक दहशतवादी पाकिस्ताननेही सहकार्याची भाषा वापरली आहे, हे दुसरे आश्चर्य म्हणावे लागेल. यामुळे बांगलादेशच्या परराष्ट्र धोरणावर दबाव वाढू शकतो. भारतासाठी ही परिस्थिती संधी आणि आव्हान दोन्ही घेऊन येणारी आहे. बांगलादेशात आपला पारंपरिक प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी भारताला संवेदनशील, पण ठाम राजनैतिक धोरण आखावे लागेल. एकूणच, बीएनपीचा विजय हा बांगलादेशातील लोकशाहीच्या पुनरुज्जीवनाचा संकेत आहे. अस्थिरतेतून बाहेर पडण्याची, हिंदू अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्याची आणि प्रादेशिक शांततेला हातभार लावण्याची ही संधी आहे. भारतबांगलादेश संबंधांच्या दृष्टीने हा क्षण निर्णायक ठरू शकतो. मात्र, या 'शुभ वार्ते'चे रूपांतर दीर्घकालीन मैत्रीत करण्यासाठी दोन्ही देशांच्या नेतृत्वाने संयम, संवाद आणि परस्पर विश्वास या त्रिसूत्रीवर चालणे गरजेचे आहे. अन्यथा, आशेचा हा किरणही राजकीय वादळात मावळण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# सरासरी दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची

संपूर्ण जगातील सर्व देशांचे सकल देशांतर्गत उत्पादन एकूण सुमारे १०० लाख कोटी डॉलर्स आहे. यामध्ये भारताचा वाटा केवळ ३.५० टक्के आहे, म्हणजे भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन सुमारे ३.५० लाख कोटी डॉलर आहे. तर, संपूर्ण जगातील १७.५ टक्क्यांहून अधिक लोक भारतात राहतात. लोकसंख्येच्या तुलनेत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन खूपच कमी आहे. आता सकल देशांतर्गत उत्पादन वाढविण्यासाठी केंद्र सरकार आणि अनेक राज्य सरकारे पूर्ण समर्पणाने काम करत आहेत. मात्र, संपूर्ण जगामध्ये जीडीपीच्या बाबतीत भारत पाचव्या क्रमांकावर आला असून आता फक्त अमेरिका, चीन, जपान आणि जर्मनी हे देश त्याच्यापुढे आहेत. परंतु, मोठ्या लोकसंख्येमुळे, भारतातील दरडोई उत्पन्न इतर अनेक देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. प्रत्येक भारतीयाचे सरासरी उत्पन्न प्रति वर्ष २,२०० डॉलर आहे, तर अमेरिकेमधील सरासरी दरडोई उत्पन्न ७०,००० डॉलर प्रति वर्ष आहे आणि चीनची लोकसंख्या भारतापेक्षा जास्त असूनही. प्रत्येक चीनी नागरिकाचे सरासरी उत्पन्न १२,००० डॉलर प्रतिवर्ष आहे. अशाप्रकारे आता देशातील सरासरी दरडोई उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यामध्ये भारताच्या युवाशक्तीचे योगदान आवश्यक झाले आहे.

आज कोणत्याही देशासाठी जास्त लोकसंख्या आणि त्यात तरुण लोकसंख्येचा जास्त सहभाग ही त्या देशासाठी अतिशय फायदेशीर गोष्ट मानली जाते. आज विशेषत: जपान, जर्मनी, अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, चीन, कॅनडा इत्यादी अनेक विकसित देशांमध्ये जन्मदर कमी झाला आहे आणि या देशांमध्ये प्रौढ नागरिकांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे आणि तरुण लोकसंख्येची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे युवा वर्गाची उपस्थिती महत्त्वाची मानली जाते. अशा प्रकारे तरुण लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून भारत खूप फायदेशीर स्थितीत आला आहे. भारताच्या एकूण १४० कोटी लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्येचे वय २५ वर्षांपेक्षा कमी आहे आणि ६५ टक्के लोकसंख्येचे वय ३५ वर्षांपेक्षा कमी आहे. बहुतेक तरुण, म्हणजे ६० कोटी भारतीय नागरिक १८–३५ वयोगटातील आहेत. भारतीयांचे सरासरी वय केवळ २९ वर्षे आहे, तर चीनमधील नागरिकांचे सरासरी वय ३७ वर्षे आणि जपानच्या नागरिकांचे सरासरी वय ४८ वर्षे आहे. त्यामुळेच भारताला तरुण देश म्हटले जात असून आज संपूर्ण जगाचे डोळे भारताकडे लागले आहेत. आता अशी परिस्थिती दिसू लागली आहे की भारताने जर आर्थिक प्रगती केली तर संपूर्ण जग आर्थिक प्रगती करताना दिसेल.



आज भारतातील साक्षरता दर ८० टक्क्यांच्या आसपास पोहोचला आहे, जो खूप चांगला दर म्हणता येईल. मात्र, शहरी आणि ग्रामीण भागातील तरुणांमध्ये शिक्षणाची पातळी वेगळी दिसून येते. त्यामुळे भारतातील तरुणांमध्ये कौशल्याचा अभाव असल्याने देशाच्या आर्थिक विकासात त्यांचे योगदान समाधानकारक पातळीवर होत नाही. भारतातील तरुणांमधील शिक्षणाचा स्तर अधिक सुधारण्यासाठी अलीकडे भारतात अनेक नवीन उच्च शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. आता नवीन शैक्षणिक धोरणही येऊ घातले आहे.

भारतातील सुशिक्षित तरुण अनेक विकसित देशांमध्ये पोहोचत आहेत आणि तंत्रज्ञान, औषध आणि व्यवस्थापन क्षेत्रात आपली सेवा देत आहेत आणि या देशांतील अनेक खाजगी संस्था एक प्रकारे भारतीय चालवत आहेत. आज अनेक आखाती देशांमध्ये तसेच जपानमधील रुग्णालयांमध्ये भारतीय परिचारिकांना मोठी मागणी आहे. केंद्र सरकारच्या धोरणांमुळे ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, जपान, कॅनडा, अमेरिका, जर्मनी आणि आखाती देश आता भारतीय वंशाच्या नागरिकांवर विश्वास ठेवून त्यांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात पुढे नेण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. आज गरज आहे की, देशातील तरुणांनी पुढे येऊन केंद्र आणि राज्यांच्या विविध योजनांचा लाभ घेऊन देशाच्या विकासात आपले योगदान वाढवावे, त्यांच्यातील कौशल्ये विकसित करावीत, जेणेकरून भारताला विकसित राष्ट्रांच्या श्रेणीमध्ये आणता येईल.

**–मच्छिंद्र ऐनापुरे**
जत जि. सांगली

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे



आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांरांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकारांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत) तर आईचे नाव विठाबाई असे होते.

लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रागाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली.

भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करताना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यातिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले.

१८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले.


मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतिकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगम पूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला.

भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# श्रम विकासाचा पाया

प्रत्येक व्यक्तीने दररोज काही ना काही श्रम करावेत. श्रम हाच आपला दाता, तीच आपली माता आहे, आणि करता, करविता तोच आहे, त्यासाठी श्रम करणे महत्त्वाचे आहे. जिथे काम केले जाते तेथे प्रत्यक्ष भगवान येत असतो. जिथे राबती हात तेथे हरी प्रत्येक यशस्वी व्यक्ती, राष्ट्र किंवा समाज कधी पुढे जातो तर तो केलेल्या सातत्यपूर्ण परिश्रमातून पुढे जातो. म्हणून श्रम हा विकासाचा पाया आहे.



गुरुकुल शिक्षण पद्धतीत श्रमाला फार महत्त्व होते. श्रम करूनच विद्यार्थी शिकत होते. त्यामध्ये त्यांना कसलाही कमीपणा वाटत नव्हता. श्रम करण्याची कधीही कोणाला लाज वाटू नये. बदलत्या काळात भौतिक साधनांची उपलब्ध झाली. लोकांना काम कमी लागू लागले. त्यामुळे आळस वाढले, आजच्या मुलांना थोडे जरी काम सांगितले तर बऱ्याच जणांना दम लागतो, कंटाळा येतो, त्यातून अनेक जणांना आजार जडले. समाजात दोन वर्ग निर्माण झाले, एक कामगारांचा आणि दुसरा भांडवलदारांचा. त्यामुळे भेदाभेद निर्माण झाला. कर्मवीर भाऊराव पाटलांनी त्यांच्या संस्थेत 'कमवा आणि शिका' पद्धतीने श्रम करायला सांगितले. नेहमी श्रम करा. श्रम प्रतिष्ठेवरच समाजाचा विकास अवलंबून असतो. समाजामध्ये एकात्मता वाढायची असेल तर एकत्रित येऊन श्रम करावेत. वेगवेगळ्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून विद्यार्थ्यांना श्रम करण्यास शिकवतात. त्यामुळे श्रमाचे महत्त्व कळते. महात्मा गांधीजी चरख्यावर सूत कताई करत होते. कारण त्यातून त्यांचे श्रम समाजाला कळाले. बाबा आमटेंनी कुष्ठरोग्यांची सेवा करून आपले श्रम दाखवून दिले. तसेच मदर तेरेसा यांनी आयुष्यभर समाजाची सेवा केली. म्हणून श्रमाचे महत्त्व कमी होता कामा नये. श्रमप्रतिष्ठा हे एक नैतिक मूल्य आहे. ते आपल्यावर श्रमावर अवलंबून आहे. म्हणून श्रमदान करत चला.

श्रम करणाऱ्या माणसाला कुठेही मानसन्मान असतो. लोकशिक्षक गाडगे महाराज अगोदर श्रम करायचे आणि नंतर ते गावातील लोकांनी दिलेलं अन्न आपल्या गाडग्यात घेऊन खात असत. काम न करता त्यांनी कधीच काही खाल्लं नाही, स्वतःच्या मुलीला सुद्धा त्यांनी त्यांच्या आश्रमात काम केल्याशिवाय भोजन करू नये असे सांगितले. म्हणून श्रम फार महत्त्वाचे आहेत, श्रम न करता 'दे रे हरी पलंगावरी' असे म्हटले तर काही मिळत नाही, दैववादी होण्यापेक्षा कार्य करून श्रम करून कर्तृत्वान बना, 'कोशिश करीत राहा, कोशिशीमधून तुम्हाला सर्व काही साध्य होते, म्हणून 'कोशिश करने वालों की हार नही होती' असे म्हटले जाते. सारखे श्रम करा; मोठे व्हा, तुम्हाला कधीही, कुठेही, सन्मानच मिळेल, परंतु आळशी माणसाला काही मिळणार नाही, सारखे चालत राहा, संकल्प करा, अभ्यास करा, तरुणांने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून मोठे अधिकारी व्हावेत. एक, दोन वेळेस अपयश आले तरी तिसऱ्या वेळेस आपण विजयी होणार म्हणजे होणारच, असे मनाशी खूणगाठ बांधावी आणि आतापर्यंत झालेले थोर व्यक्ती त्यांच्या श्रमामधूनच मोठे झाले आहेत,जर श्रम करत नसाल तर पाठीमागे राहाल.

अनेक खेळाडूंनी शतके बनवले कारण त्यांची त्यात श्रम आहेत. अनेक साहित्यिकांनी ग्रंथ, लेख पुस्तके लिहिले त्यांना पुरस्कार मिळाले ते श्रम केल्यामुळेच; कोणालाही काहीच न करता आजपर्यंत कधीच मोठे होता आले नाही, म्हणून 'प्रयत्नाने वाळूचे कण रगडीता तेलही गळे' असे आपण ऐकतो. म्हणून तुम्ही श्रम करा. शेतकरी राब–राब राबतो. दिवसरात्र कष्ट करतो, म्हणून आज आपण गुण्यागोविंदाने एकत्रित वागत आहोत. मला तरुणांना, युवकांना एवढंच सांगायचं आहे की? त्यांनी आपल्या जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर 'उठा जागे व्हा' आणि यशस्वी व्हा, जो माणूस थोडा थोडा चालत जातो तो अंतर कापतो, जो माणूस जागचा हालत नाही, त्याला कुठेही जाता येत नाही व यशही मिळत नाही. समाजातील काही माणसांनी मोठमोठे पर्वत पार केले, तरीही ते थकले नाहीत.

काही व्यक्तींनी आपले जीवनच सेवेसाठी आहे म्हणून समाजाला सेवा दिल्या. सेवा करा, आपोआपच मेवा मिळतो असे म्हणतात. काही वार्ताहार अगोदर छोट्या–छोट्या बातम्या तयार केले. नंतर ते पत्रकार झाले. नंतर उपसंपादक आणि नंतर श्रमाच्या जोरावर जिद्दीवर संपादक होऊन स्वतंत्र वर्तमानपत्र काढून समाजाची सेवा केली. अन्याय झालेल्या व्यक्तीला न्याय दिला. त्यांच्या मनातली अभिव्यक्ती बाहेर आली आणि ते सुखी झाले; असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. खरंच सर्वसामान्य माणसे मोठी का होतात? कारण ते कष्टाने पुढे गेलेले असतात, आणि दुसऱ्यांसाठी ते प्रेरणादायी व्यक्ती म्हणून पुढे येतात. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे साध्या व गरीब घरातून मोठे झाले, आणि आज भारतरत्न म्हणून त्यांचा गौरव केला जातो, अशा व्यक्तींचे पुन्हा पुन्हा नाव का घ्यावे वाटतात, तर ते तेवढे मोठे श्रम केल्यामुळे झालेत हे विसरून चालणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांनी अनेक लढाया केल्या, शत्रूला पराभूत केले या हिंदवी स्वराज्यासाठी आपले आयुष्य झिजविले, ते सर्व श्रमामधूनच साध्य झाले, म्हणून श्रम हा विकासाचा पाया आहे. जर तुम्ही काहीच केले नाही तर तुम्हाला दारिद्र्य येईल. नंदनवनाचे नरक होईल. अपयश आल्यानंतर तुम्ही दैवावर, नशिबावर अवलंबून राहाल तर तुम्हाला काहीच मिळणार नाही, म्हणून तुम्ही थोर व्यक्तीची चरित्रे वाचा, तुमच्या कामातून तुमचं नाव पुढे येते असे कार्य करा, कारण कार्य करणारा माणूस आजपर्यंत पाठीमागे राहिला नाही. 'जो दैवावरील विसंबला। त्याचा कार्यभाग संपला।।' हे खरोखर आहे. जनसामान्य लोक राब–राब राबवून कष्ट करून ते पुढे जातात. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुलेंनी आपले आयुष्य सर्व समाजातील मुलांना शिकवण्यासाठी घालविले. त्यांचे त्या पाठीमागे श्रम आहेत.

मला काय त्याचे? असे म्हणून बसले असते तर? काहीही झाले नसते म्हणून प्रत्येकाचे विचार प्रगल्भ व मोठे असावेत. आपल्या विचारांवर इतरांनी विचार करावा असे ते असावेत. खोटे बोलू नका. त्यातून थोडा तुम्हाला लाभ होईल; परंतु नंतर कायमची हानी होते. म्हणून श्रम करा. विद्यार्थ्यांनी अभ्यास केल्यानंतर ते उत्तीर्ण होणार. गैरमार्गाचा अवलंब केला. जरी उत्तीर्ण झाले तरी ते आत्मविश्वासाने जीवन जगू शकत नाहीत. कारण ते बावरलेले, भेदरलेले दिसतात. म्हणून विद्यार्थ्यांनी ज्ञानाकडे गंभीरपणे बघून सचोटीने ज्ञान प्राप्त करावे.

ज्ञानाचा दर्जा त्यामुळे उंचावेल, त्यासाठी श्रम करा. दादाभाई नौरोजी नेहमी म्हणायचे 'अखंड चळवळ करा, चळवळ करा' यश आपल्या जवळ आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळेल म्हणून कार्य करा, बऱ्याच ठिकाणी आश्रमामध्ये भाविक, भक्त गेल्यानंतर थोडं श्रम करण्यासाठी सांगतात, आणि नंतरच मग त्यांना पुढील गोष्टी विचारतात, म्हणून कुठेही श्रमाला महत्त्व आहे. त्यासाठी लहानपणापासूनच तुम्ही ज्या ठिकाणी जाता त्या ठिकाणी कार्य करीत राहा. त्यामुळे तुमचा विकास तुमच्या चरणाजवळ आहे.

सैनिक अहोरात्र उभे राहून सीमेवर आपली सेवा करतात. तसेच शिक्षक दिवसरात्र विद्यार्थ्यांना घडवतात. समाजामधील समाजसुधारक, क्रांतिकारक, लेखक, वकील, डॉक्टर समाजामध्ये एकात्मता नांदावी म्हणून वेगवेगळे श्रम करून करून लोकांना एकत्रित आणून पुढे नेण्याचा प्रयत्न करतात. समाज जीवंत ठेवतात. म्हणून आजच्या तरुणांनी मोबाईलमध्ये आपला अमूल्य वेळ न घालवू नये. चुकीच्या लोकांच्या सोबत न फिरता छोटा–मोठा व्यवसाय करावा. मनाशी लाजू नयेत, कर्म करीत राहा फळ तुम्हाला आपोआप मिळेल, आणि जीवनाचं सार्थक करावं ही अपेक्षा. त्यासाठी श्रम हा विकासाचा पाया आहे हे त्रिकाल सत्य आहे.

**–प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष: विठूमाऊली प्रतिष्ठान
खैरका वाडी, ता. मुखेड, जि. नांदेड

# पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाची अवैध रेतीविरुद्ध कारवाई; १ कोटी रुपयांची साधनसामुग्री जप्त





**नांदेड(प्रतिनिधी)** – नांदेड जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाने मौजे मुगट व ब्राम्हणवाडा शिवारात केलेल्या कारवाईत १ कोटी रुपयांच्या साधनसामुग्रीसह अवैध रेती जप्त करण्यात आली. या कारवाईत दोन टाटा कंपनीचे टिपर, एक जेसीबी मशीन यासह ४० ब्रास रेती जप्त करण्यात आली आहे.

शहाजी उमाप यांच्या पथकाने १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुगट व ब्राह्मणवाडा शिवारात ही कारवाई केली. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुरनं ३६/२०२६ कलम ३०३(२), ३(५), ४८(७) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस ठाणे विमानतळ येथील पोहेकॉ/संतोष राणे हे करीत आहेत. सदर कारवाईनंतर पथकाने पोलीस ठाणे मुदखेड हद्दीत मुगट शिवारातील वाळू धक्क्यावर कारवाई करीत एक टाटा कंपनीचे टिपर, एक जेसीबी मशीन यासह नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली ३० ब्रास वाळू, असा एकूण ४६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात पोलीस ठाणे मुदखेड येथे गुरनं २५/२०२६ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस ठाणे मुदखेड येथील पोहेकॉ/अंगद कदम हे करीत आहेत. सदर कारवाईवरून, पोलीस ठाणे विमानतळ व मुदखेड हद्दीतील मौजे ब्राम्हणवाडा व मुगट येथील घाटावरून मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या वाळू उपसा, साठवणूक व वाहतूक होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. उपरोक्तप्रमाणे दोन्ही कारवायांत विशेष पथकाने ३४ लाख रुपये किमतीचे टाटा कंपनीचे (३) टिप्पर, ७० लाख किमतीच्या (२) जेसीबी मशीन यांचेसह ३ लाख ५० हजार रुपये किंमतीची (७०) ब्रास वाळू असा एकूण १ कोटी, ७ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन (६) आरोपीतांना ताब्यात घेतले आहे.

सदर कारवाईत सपोनि श्रीराम माचेवाड यांचेसह पोहेकॉ/प्रदीप खानसोळे, पोहेकॉ संजीव जिंकलवाड, पोकॉ गणेश धुमाळ व पोकॉ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांना प्रशंसापत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे. आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा ९१ ५० १०० १०० या हेल्पलाईनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांचे कोट्यवधींच्या फसवणुकीचे प्रकरण; आरोपीस उच्च न्यायालयात जामीन

**नांदेड/ छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)** –धर्माबाद तालुक्यातील बहुचर्चित शेतकरी फसवणूक प्रकरणात अटकेत असलेले आरोपी संजय गंगाधर देवकर यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अखेर सशर्त जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती सचिन देशमुख यांनी हा आदेश दिला.

फिर्यादी व इतर शेतकऱ्यांनी सोयाबीन, हरभरा, तूर आदी शेतीमाल श्रीकृष्ण भुसार या दुकानात विक्री केल्यानंतर सुमारे ७ कोटी ८५ लाख रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. याप्रकरणी धर्माबाद पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. ०१९६/२०२५ दि. ५ जुलै २०२५ रोजी नोंद करण्यात आला होता. भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३१८(४), ३१६(२), ३१६(५), ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल आहे.

आरोपी संजय देवकर यांना दि. ६ जुलै २०२५ रोजी अटक करण्यात आली होती. तपास पूर्ण होऊन दोषारोपपत्र दाखल झाले आहे व खटला प्रलंबित आहे. आरोपीचा नियमीत जामिनाचा अर्ज सत्र न्यायालय बिलोली जि. नांदेड यांनी फेटाळून लावला होता. त्यानंतर आरोपीने ॲड. गजानन कदम यांच्यामार्फत उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता.

आरोपीच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला की, मुख्य आरोपीचे नातेवाईक असल्याच्या आधारावरच अर्जदारास गुन्ह्यात गोवण्यात आले असून, दुकानाच्या मालकी, व्यवस्थापन किंवा आर्थिक व्यवहारात त्यांचा कोणताही थेट सहभाग नाही, फक्त एक मुनीम म्हणून मालकाने सांगितलेली कामे केली. अर्जदाराविरुद्ध कोणतीही विशिष्ट भूमिका दाखविणारा ठोस पुरावा नाही. तसेच आरोप सर्वसाधारण स्वरूपाचे आहेत, असे न्यायालयास निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच तपास पूर्ण होऊन आरोपपत्र दाखल झाल्याने पुढील कोठडीची आवश्यकता नसल्याचे मुद्दे मांडण्यात आले. तसेच अर्जदाराविरुद्ध कुठलाही आर्थिक लाभ घेतल्याचे ठोस पुरावे नाहीत असाही युक्तिवाद करण्यात आला.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून नमूद केले की, अर्जदाराविरुद्ध प्रत्यक्ष सहभाग दर्शविणारा ठोस पुरावा अभावाने दिसतो. तपास पूर्ण झाल्याने कोठडीची गरज उरत नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात येत असून आरोपीस रु. ५०,०००/- च्या पी. आर. बाँडवर व तितक्याच रकमेच्या स्थानिक जामिनदारासह मुक्त करण्याचा आदेश देण्यात आला आहे. न्यायालयाने साक्षीदारांवर दबाव न आणणे, पुराव्यात हस्तक्षेप न करणे, न्यायालयीन सुनावणीस नियमित हजर राहणे व संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीतून परवानगीशिवाय बाहेर न जाणे, अशा कडक अटी घातल्या आहेत.

सदरील प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. गजानन कदम यांनी यशस्वी युक्तिवाद सादर केला. त्यांना ॲड. अमित तांदुळकर व ॲड. कुणाल पाटील यांनी सहाय्य केले. तर सरकारी पक्षातर्फे ॲड. सौ. आर. आर. तांदळे यांनी बाजू मांडली.

# दीड कोटींच्या कापसी पाझर तलाव दुरुस्ती कामाचे आ. चिखलीकरांच्या हस्ते भूमिपूजन



**नांदेड (प्रतिनिधी)**– गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या लोहा तालुक्यातील कापसी पाझर तलाव दुरुस्तीच्या कामाचे आ. चिखलीकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

तब्बल दीड कोटी रुपयांचे हे दुरुस्तीचे काम असून, यासाठी आ. चिखलीकर यांनीच पाठपुरावा केलेला होता.

महाराष्ट्र शासन, मृदू व जलसंधारण विभाग, नांदेड अंतर्गत जिल्हा नियोजन आणि विकास समिती अंतर्गत मौजे कापसी बु. ता. लोहा येथील त १ कोटी ५० लक्ष रुपयांच्या पाझर तलावाच्या दुरुस्तीचे काम आता होणार असल्यामुळे परिसरातील क्षेत्र हे सिंचनाखाली येणार आहे.

या भूमिपूजन कार्यक्रमास तहसीलदार विठ्ठल परळीकर, जलसंधारणचे उपअभियंता गायकवाड, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बालाजी पाटील मारतळेकर, जिल्हा परिषद सदस्य गणेशराव पाटील साबळे, सरपंच बळी पाटील बेटकर, रामराव पाटील मारतळेकर, सुभाषराव गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य गुलाब पाटील उबाळे, केरबा पाटील वडवळे, बाबुराव पाटील वडवळे, राजू पाटील वडवळे, गोविंदराव पाटील चिंचोलीकर, बाळू पाटील ढगे, संभाजी येडे, शिवराज जोमेगावकर, भगवान बेटकर, माधवराव कदम, सुमेध गजभारे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मॉर्निंग वॉक ग्रुपच्यावतीने राबविण्यात आले स्वच्छता अभियान



**नांदेड (प्रतिनिधी)**– महाशिवरात्रीचे औचित्य साधून नांदेड शहरातील आसना मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने विमानतळ रोड येथील गार्डन परिसरात श्रमदानातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छता हीच सेवा या भावनेतून आयोजित केलेल्या या उपक्रमाला ग्रुपच्या सदस्यांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या सेवाभावी उपक्रमाचे नेतृत्त्व ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तथा आसना मॉर्निंग वॉक ग्रुपचे अध्यक्ष आनंदराव कल्याणकर यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सहभागी सदस्यांनी आनंदाने, एकात्मतेने आणि समर्पणभावनेने श्रमदान केले.

या मोहिमेत सेवानिवृत्त डीवायएसपी व्ही. एस. तोटावाड, सेवानिवृत्त पीआय मल्हारे, दुझमल, गायकवाड, ईडगे, रावसाहेब देशमुख बेलमंडळकर आदी मान्यवर सहभागी झाले होते.

तरोडा बुद्रुक, सावंगी तसेच शहरातील विविध भागांतून आलेल्या मॉर्निंग वॉकर्सनी सकाळी ७.३० वाजताच रेल्वे डिव्हिजनच्या गेट क्रमांक ४ पासून गाजर गवत काढण्याचे काम सुरू केले. सुमारे ८०० मीटर परिसरातील ट्रॅकवरील गाजर गवत उपटून परिसर स्वच्छ करण्यात आला. ही श्रमदान करणारी पहिली टीम होती.

रेल्वे डिव्हिजनच्या गेट क्रमांक १ पासून विमानतळ पोलीस चौकीपर्यंत रस्त्याची स्वच्छता करण्यात आली. रस्त्यावर पडलेला काडीकचरा, प्लास्टिक पिशव्या, गुटखा पाउच आणि इतर कचरा गोळा करून एकत्रितपणे विल्हेवाट लावण्यात आली.

दुसऱ्या टीमने झाडू मारून रस्त्यावरील माती गार्डनमधील झाडांच्या बुंध्याशी टाकून झाडांना बळकटी देण्याचे कार्य केले. या टीममध्ये सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता नंदकुमार पत्तेवार, सेवानिवृत्त माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामराव थडके, सेवानिवृत्त अभियंता अजिज लहानकर, सेवानिवृत्त पीएसआय मोईनोदिन सय्यद, सेवानिवृत्त वरिष्ठ बँक अधिकारी बशिर अहमद लहानकर, जि. प. चे लेखाधिकारी ढगे, प्रकाश पवार, गिरिष कहाळेकर, सत्यजित टिप्रेशवार, बोरा, मारोती पाटील, गगन चॅवल, एस. एस. चव्हाण आदी सेवाभावी व्यक्ती सहभागी झाल्या होत्या.

संपूर्ण उपक्रमात स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि समाजसेवेचा सुंदर संगम दिसून आला. सामूहिक प्रयत्नांनी परिसर स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न झाला, तसेच समाजात सकारात्मक संदेशही पोहोचला. अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव अधिक दृढ होतो, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

# राष्ट्रसंत गाडगेबाबांचा पुतळा उभारण्यासाठी उपोषणाचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचा पुतळा नांदेड शहरामध्ये उभारावा, या मागणीसाठी नॅशनल धोबी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष संतोष औंढेकर यांनी १ मार्चपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा महानगरपालिका आयुक्त यांना दिला आहे.

या निवेदनात राजकॉर्नर ते आसना मार्गास राष्ट्रसंत गाडगेबाबा रोड नं. ३६ या नामफलकाचे अनावरण करण्यात यावे अशी मागणीही करण्यात आली आहे. तत्कालीन महापौर अजयसिंह बिसेन यांच्या कार्यकाळात नियोजन समितीच्या बैठकीत हा ठरावीर मंजूर करण्यात आला होता. मात्र मागील १५ वर्षांपासून या मार्गाच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले नाही, तसेच चैतन्यनगर शिवमंदिराच्या बाजूस असलेल्या उद्यानात किंवा जुना मोंढा टॉवर येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचा पुतळा उभारावा अशी मागणीही औंढेकर यांनी केली आहे. २३ फेब्रुवारी रोजी गाडेबाबांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून या कामास तत्काळ सुरुवात करावी अन्यथा १ मार्चपासून नांदेड मनपासमोर आमरण उपोषणाचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदन देताना नॅशनल धोबी महासंघाचे वामनराव पेनूरकर, किशनराव खतगावकर, गोविंदराव कुंटूरकर कोंडीबा मांजरमकर, लक्ष्मण कापसे, पिंटूभाऊ मारवाडीकर, प्रमोदभाऊ भंडारे, रवीसिंघ खालसा, उद्धव बगाटे, माधवराव तेलंग, विठ्ठल होळकर, मार्तंड भंडारे, आकाश झाडे, कैलास तेलंग, शंकर कापसे, रामप्रसाद हिवरेकर यांच्यासह महासंघाचे अनेक कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेडच्या टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशनची अर्थ संकल्पावर चर्चा संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेडच्या टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशनच्यावतीने नुकत्याच सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ वर महत्त्वपूर्ण चर्चासत्र नुकतेच पार पडले. या चर्चासत्रात असोसिएशनचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते माजी अध्यक्ष सीए गोविंद मुंदडा यांनी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मधील विविध करसुधारणा, महत्त्वाच्या तरतुदी व त्यांचे व्यावहारिक परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

बैठकीत अर्थसंकल्पातील अनेक बदलांवर सखोल चर्चा करण्यात आली. विशेषतः नव्या जाचक (कठोर) तरतुदींविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच त्यांची अंमलबजावणी करताना घ्यावयाच्या आवश्यक काळजीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदस्यांच्या विविध शंकांचे समाधानही करण्यात आले.

अखेर सीए जयप्रकाश फलोर मार्गदर्शन केले तर अध्यक्षीय समारोप गंगाबिशन कांकर यांनी केले चर्चासत्र यशस्वीरीत्या संपन्न झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव सीए सागर सोमानी यानी केले. यावेळी ॲड. विवेक साले, सीए महेश तोतला, ॲड. धीरज शर्मा, ॲड. प्रवीण अनंतवार, सुमित नागला, प्रमोद बाहेती, ॲड. बी. जी. राजे, ॲड. संजय पवार, संग्राम निरने, दिगंबर हिवराळे, कृष्णा सारडा, अमित पवार इत्यादी सदस्य उपस्थित होते.

# इस्त्रायलमध्ये भारतीय उमेदवारांना नोकरीची संधी; इच्छुक उमेदवारांनी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एनएसडीसी) मार्फत इस्त्रायलमध्ये नुतनीकरणा अंतर्गत कामासाठी कौशल्यपूर्ण भारतीय उमेदवारांची निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तरी नांदेड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या निवड प्रक्रियेसाठी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त बा. सु. मरे यांनी केले आहे. इच्छुक उमेदवारांसाठी पात्रता, निकष, निवड प्रक्रिया, लाभ याबाबतची सर्व माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**पात्रता निकष**–किमान अनुभव :- ३ वर्षे (Renovation Interior Work मध्ये कौशल्य आवश्यक). शैक्षणिक पात्रता किमान १० वी उत्तीर्ण असावा. वयमर्यादा २५ ते ५० वर्षे. इंग्रजी ज्ञान वाचन, लेखन आणि बोलणे यामध्ये प्राविण्य. पूर्व अनुभव इस्त्रायलमध्ये पूर्वी नोकरी नसावी. गुन्हेगारी रेकॉर्ड भारतातून स्वच्छ पीसीसी आवश्यक, व्यसनमुक्त इतिहास. आरोग्य शारीरिक व मानसिकदृष्ट्यासक्षम मोठे आजार नसावेत. पासपोर्ट किमान ३ वर्षे वैध. भारतीय नागरिकत्व आवश्यक. कुटुंबीय इस्त्रायलमध्ये नातेवाईक नसावे.

**एकूणपदे : २६००**

१.Plastering Work - १००० पदे, २. Ceramic Tiling १००० पदे, ३. Drywall Worker - ३०० पदे, ४. Mason ३०० पदे

**निवड व स्क्रीनिंग प्रक्रिया**

राज्य सरकार प्राथमिक छाननी करून उमेदवारांची माहिती छडऊ कडे पाठवेल. इंग्रजी, पात्रता, अनुभव व डोमेन ज्ञान तपासून उमेदवारांची पहिली स्क्रीनिंग होईल. वैध पासपोर्ट अनिवार्य. NSDC निवडलेल्या उमेदवारांची माहिती इस्त्रायल टीमकडे पाठवेल.

इस्त्रायल टीम यांच्या नाव तपासणीनंतर निवडलेल्यांना प्रोफेशन लटेस्ट द्यावी लागेल. वैद्यकीय चाचणी व त्याचा खर्च उमेदवाराने करावा. पार्श्वभूमी पडताळणी गुन्हेगारी तपासणीसह खर्च उमेदवाराचा. व्हिसा विमान तिकिटे उमेदवाराने मार्केट रिटन घेणे आवश्यक.प्रशिक्षण व प्री-डिपार्चरओरिएंटेशन NSDC अंतर्गत अनिवार्य.

# नवनिर्वाचित नगरसेवकांकडून प्रभाग तीनची पाहणी; नागरिकांशी साधला संवाद

## विविध प्रस्तावित कामांची यादी खा. अशोक चव्हाण, आ. श्रीजयाताई चव्हाण यांच्यासह नगरपालिकेकडे सुपूर्द

**भोकर (प्रतिनिधी)**– शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील प्रलंबित विकासकामे आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या मार्गी लावण्यासाठी आता नवनियुक्त नगरसेवक आणि लोकप्रतिनिधींनी कंबर कसली आहे. नवनिर्वाचित नगरसेविका आरतीताई यशवंतकर आणि नगरसेवक योगेश भोकरकर यांनी प्रभाग क्रमांक ३ मध्ये जाऊन रस्ते, नाल्या यांसह प्रभागातील दुरावस्थेची पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधून सर्व समस्या तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले.

शहरातील अविकसित भाग म्हणून प्रभाग क्रमांक तीनकडे पाहिले जाते. गेल्या काही काळापासून रस्त्यांची दुरवस्था, तुंबलेल्या नाल्या, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट नसणे, पथदिवे, स्वच्छता यासह अनेक गैरसोयींचा पाढा नागरिकांनी नवनियुक्त नगरसेवकांपुढे वाचला.

या पार्श्वभूमीवर नगरसेविका तथा सभापती आरतीताई यशवंतकर आणि नगरसेवक तथा सभापती योगेश भोकरकर यांनी प्रभागातील प्रत्येक गल्लीत जाऊन केवळ पाहणीच नाही, तर नगरसेवकांनी ठिकठिकाणी थांबून नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. निवडणूक झाली की लोकप्रतिनिधी गायब होतात, असा अनुभव आजवर होता; मात्र नवीन नगरसेवकांनी स्वतःहून येऊन विचारपूस केल्याने आम्ही समाधानी आहोत, अशी भावना स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली. प्रभाग ३ मधील जनतेने माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, त्याला मी पूर्णपणे जागीन. निवडणुकीच्या काळात दिलेली आश्वासने केवळ कागदावर राहणार नाहीत तर ते प्रत्यक्षात पूर्ण होतील. प्रभाग क्रमांक ३ चा सर्वांगीण विकास करणे हेच आमचे ध्येय आहे. केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कामातून आम्ही बदल घडवून दाखवू, यावेळी नागरिकांना बोलताना नगरसेविका आरतीताई म्हणाल्या.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, आदर्श, स्वराज्य संकल्पना आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदान यांचे दर्शन घडविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम १७ व १८ फेब्रुवारी २०२६ रोजी डॉ. शंकरराव चव्हाण सभागृह येथे आयोजित करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे : १७ फेब्रुवारी २०२६ सायंकाळी ६ ते ७ प्रसिद्ध अभ्यासक व पुरातत्त्व संशोधक केतन पुरी यांचे व्याख्यान. सायंकाळी ७ ते ९ शाहीर प्रा. डॉ. शिंदे व संच यांचा शाहीरी जलसा.

१८ फेब्रुवारी २०२६ सायंकाळी ६ ते ८ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम.

हा कार्यक्रम सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, युवक-युवती, महिला तसेच सामाजिक व सांस्कृतिक संस्थांच्या प्रतिनिधींसाठी खुला आहे.

जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्यांचा पराक्रम व प्रेरणादायी जीवन नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

# बिलोली नगर परिषदेत १४ वा की ११ वा वित्त आयोग? विषय सूची आणि जाहिरातीत विसंगती; प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**बिलोली (प्रतिनिधी)**– बिलोली नगर परिषदेच्या सर्वसाधारण बैठकीत १४ व्या वित्त आयोगाच्या निधीअंतर्गत दुकान गाळ्यांच्या लिलावाचा विषय सूचीमध्ये समाविष्ट करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात नगर परिषदेकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीत ११ वा वित्त आयोग असा उल्लेख करण्यात आल्याने प्रशासकीय पातळीवर गंभीर विसंगती उघड झाली आहे. या प्रकारामुळे नगरसेवक, व्यापारी व नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नगर परिषद कार्यालयातून प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीत दुकान गाळ्यांचे जाहीर फेर लिलाव असा उल्लेख असून त्यात स्पष्टपणे ११ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत आरक्षण क्रमांक १० व ११ मधील १४ दुकान गाळ्यांचा फेरलिलाव करण्यात येणार असल्याचे नमूद आहे. हा लिलाव दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नगर परिषद कार्यालयात होणार असल्याचे जाहिरातीत नमूद करण्यात आले आहे. प्रत्येक गाळ्यासाठी अनामत रक्कम २ लाख रुपये (न परतावा) आणि मासिक भाडे २ हजार रुपये प्रति महिना निश्चित करण्यात आले आहे. तसेच लिलावासाठी विविध अटी व शर्ती देखील जाहीर करण्यात आल्या आहेत.

मात्र नगर परिषदेच्या सर्वसाधारण बैठकीच्या विषय सूचीमध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या नावाने विषय ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. म्हणजेच बैठकीत १४ व्या वित्त आयोगाचा उल्लेख, तर अधिकृत जाहिरातीत ११ व्या वित्त आयोगाचा उल्लेख अशी परस्परविरोधी नोंद आढळून येत आहे. त्यामुळे नेमका कोणत्या वित्त आयोगाच्या निधीतून बांधण्यात आलेले गाळे वितरित करण्यात येणार आहेत का पुन्हा फेरलिलाव होत आहे? याबाबत स्पष्टता नसल्याची भावना व्यक्त होत आहे. चुकीच्या कामाचा अट्टाहास लक्षात घेता काही कर्मचाऱ्यांनी बदली करून घेणे पसंत केल्याचे सांगण्यात आले.

कारण ११ वा व १४ वा वित्त आयोग हे कालावधी, निधी, गाळे वितरण पद्धती आणि अटी-शर्तींच्या दृष्टीने वेगवेगळे आहेत. त्यामुळे योजनेचे नाव चुकीचे देणे ही साधी तांत्रिक चूक नसून प्रशासकीय बेपर्वाई मानली जात आहे. भविष्यात कायदेशीर अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शिवार

# वेळीच रोखा आंबा फळगळ



**पावसाळी वातावरणामुळे विविध कीड व रोगांमुळे आंबा फळांची गळ होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे फळगळीच्या विविध कारणांचा अभ्यास करून उपाययोजना कराव्यात. आंबा बागेत एकाच जातीची झाडे लावल्यास ४० - ५० टक्के संयुक्त फुलांचे परागीकरण होत नाही. परिणामी त्यांचे फक्त अंडाशय वाढून गळ होते. त्यामुळे आंबा बाग लावताना १० टक्के इतर जातीची झाडे लावणे महत्त्वाचे ठरते.**



### रोगनियंत्रण

- भुरी रोग : फवारणी प्रतिलिटर पाणी विद्राव्य गंधक २ ग्रॅम किंवा डिनोकॅप १ ग्रॅम.
- करपा रोग : फवारणी प्रतिलिटर पाणी कॅप्टन २ ग्रॅम किंवा कॉपरऑक्सिक्लोराईड ३ ग्रॅम किंवा थायोफिनेट मिथाईल १ ग्रॅम.

यंदा सुरुवातीच्या काळात थंडी उशिरा सुरू झाली. मध्येच तापमान वाढून पुन्हा थंडीची तीव्रता वाढली. त्यामुळे आंबा झाडांना पुन्हा पुन्हा मोहर आला. या पुनर्मोहरामुळेदेखील आंबा फळांची मोठ्या प्रमाणावर गळ होताना दिसून येत आहे. ज्या बागांमध्ये नुकतीच फळधारणा सुरू झाली आहे तेथे ताबडतोब ५० पीपीएम (५० मिलिग्रॅम प्रतिलिटर पाणी) जिब्रेलिक ॲसिडची फवारणी केल्यास फळगळ रोखण्यास मदत मिळणार आहे. बहुतांश आंबा पाणी न मिळाल्याने फळांची मोठ्या प्रमाणात गळ होत असते. त्यामुळे आंबा फळे वाटाणा आकाराची झाल्यानंतर दर दहा दिवसांच्या अंतराने तापमानवाढीचा अंदाज घेऊन पाणीपुरवठा करावा. जेणेकरून फळगळ थांबणे सोईचे होईल. काही वेळा तापमानात अचानक वाढ झाल्यास फळांची मोठ्या प्रमाणात गळ होत असते. अशावेळी मोठी फळेदेखील गळून पडतात. अशावेळी त्वरित संरक्षित सिंचन करावे. त्यामुळे बागेतील तापमान कमी होऊन



झाडांची फळगळ ही अन्नद्रव्यांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे होते. अन्नद्रव्ये संतुलित प्रमाणात न मिळाल्याने मोठ्या प्रमाणात फळांची गळ होते. ही फळगळ रोखण्यासाठी पोटॅशियम नायट्रेट १ टक्का (१० ग्रॅम प्रतिलिटर पाणी) या प्रमाणात फवारणी करावी. तसेच फळांच्या विविध अवस्थेत युरिया २ टक्के (२० ग्रॅम प्रतिलिटर पाणी) अधिक एन ए ए २० पीपीएम (२० मिलिग्रॅम प्रतिलिटर पाणी) याची १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. बऱ्याच आंबा झाडांना सुरुवातीच्या अवस्थेत आवश्यकतेपेक्षा जास्त फळधारणा होत असते. सर्व फळांना पोसण्याची क्षमता झाडामध्ये नसते. त्यामुळेही फळगळ होताना दिसते. फळे पोसण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी युरिया २ टक्के (२० ग्रॅम प्रतिलिटर पाणी) या प्रमाणात फवारणी करावी. आंबा फळांची वाढ होण्यासाठी व फळगळती थांबविण्यासाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. वाढीच्या काळात फळगळ थांबविणे शक्य होते. मागील आठवड्यात राज्यातील काही भागात रिमझिम पाऊस झालेला आहे, तर काही ठिकाणी ढगाळ हवामान होते. यामुळे मोठ्या प्रमाणात भुरी व करपा या बुरशीजन्य रोगांची लागण होण्याची शक्यता आहे. त्यामुळेदेखील फळगळ होऊ शकते. अशावेळी भुरी व करपा या रोगांच्या नियंत्रणासाठी फवारणी करावी. काही बागांतील आंबा झाडांवर बोर, लिंब एवढ्या आकाराची फळे व मोहर तसेच नवीन पालवी तिन्ही एकाचवेळी दिसत आहे. नवीन पालवी अन्नद्रव्य ओढून घेत असल्यामुळेही फळांच्या पोषणासाठी अन्नद्रव्य कमी पडून फळगळ होत आहे. अशावेळी होणारी फळगळ रोखण्यासाठी १२:६१:० या विद्राव्य खताची २ टक्के (२० ग्रॅम प्रतिलिटर पाणी) या प्रमाणात फवारणी करावी. गळून पडलेली फळे वेचून बागेबाहेर नेऊन त्यांची विल्हेवाट लावावी जेणेकरून कीड-रोगांचा प्रादुर्भाव टाळणे सोईचे होईल.



# मोसंबीतील फुल-फळगळ !

**मोसंबीला भरपूर फुले लागतात. फळधारणाही भरपूर होते, परंतु एकूण फुलांच्या ०.५ ते १ टक्का इतकीच फळे काढणीपर्यंत हाती लागतात. म्हणून फळगळ ही मोसंबी पिकातील गंभीर समस्या आहे. फळधारणेपासून ते फळ काढणीपर्यंत वेगवेगळ्या कारणांमुळे फळगळ होते. नैसर्गिक कारणाव्यतिरिक्त, देठांच्या इजेमुळे, रोगांमुळे व फळमाशी आणि फळरस शोषण करणाऱ्या पतंगामुळे अर्धी कच्ची फळे पिवळी पडतात, सडतात व गळतात. फळगळ काही विशिष्ट काळात अतिशय तीव्र व जास्त प्रमाणात असते. मोसंबीमध्ये सुध्दा सुमारे १ ते २ लाखांवरील फुलापैकी फक्त ०.२ ते २ टक्के एवढीच फळामध्ये रुपांतरीत होतात. या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या फुलगळीची इतर बरीचशी कारणे असली तरी यासाठी मुख्यतः वातावरणातील आर्द्रता, कीड व रोग इत्यादी कारणीभूत आहेत.**

## फुलगळ, फळगळ होण्याची कारणे...

फळझाडावर फुलांची निर्मिती झाल्यानंतर ती उमलत असताना त्यांची गळ होत असते. दुसरी फुलगळ १५ ते २५ दिवसांनंतर होते. या वेळी ज्या फुलांचे फळधारणेत रुंपातर झाले नाही अशी फळे गळून पडतात. फळधारणा झालेली अती लहान फळेदेखील गळून पडतात. बोरांच्या आकारांची व त्यापेक्षा मोठी झाल्यानंतर पक्व होईपर्यंत वाढ झालेली फळे देखील गळून मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. वाढ झालेल्या फळात इथिलिन तयार होते व त्यामुळे फळगळ होत असते. ढगाळ वातावरणात बुरशीचा प्रादुर्भाव होऊन देठाजवळ काळे डाग पडतात आणि फळे मोठ्या प्रमाणात गळून पडतात यालाच कोलेटोट्रीकम बुरशी असे म्हणतात. याच वातावरणात आर्मडस्केल कीडीचा प्रादुर्भाव होऊनही फळे मोठ्या प्रमाणात गळतात. त्यासाठी एकत्रितरीत्या बुरशीनाशक आणि कीटकनाशक फवारावे. यामध्ये कार्बेन्डाझीम २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात आणि डायमेथोएट १.५ मिली प्रति लिटर पाण्यात किंवा मॅन्कोझेब अधिक मेटालेक्झील हे संयुक्त बुरशीनाशक २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात आणि ॲसिफेट १ मिली प्रति लिटर पाण्यातून फवारावे.

## उपाययोजना करताना...

प्रकाश सापळ्यांचा उपयोग करावा. रात्री बागेत १०० वॅटचे बल्ब अधून मधून लावावेत. याखाली केरोसिन किंवा कीटकनाशकयुक्त पाणी असलेले पसरट भांडे ठेवावे. विद्युत प्रवाह नसल्यास गॅसबत्तीचा वापर करता येईल. पतंग प्रकाश झोताकडे आकर्षित होऊन धडक देतात आणि भांड्यातील पाण्यात पडतात. पतंगाला आकर्षित करून मारण्यासाठी विषारी आमिषांचासुध्दा वापर करता येईल. त्यासाठी १० लिटर पाण्यात ५०० ग्रॅम गूळ आणि २० मि.लि. क्लोरपायरीफॉस मिसळून आमिषाचे द्रावण तयार करावे. साधारणतः २५० मि.लि. द्रावण मोठे तोंड असलेल्या डब्यात टाकून ते झाडावर टांगावेत. यासाठी रिकाम्या झालेल्या कीटकनाशकांच्या डब्यांचा वापर करता येईल. या पतंगाच्या अळ्या गुळवेल, वासनवेल किंवा तत्सम तणांवर उपजीविका करीत असल्यामुळे परिसरातील या तणांचा नायनाट करावा. खाली पडलेली फळे नियमित वेचून खड्ड्यात पुरून टाकावीत. रात्री ७.०० वाजताच्या दरम्यान ओलसर कचरा जाळून बागेत धूर करावा. परंतु यामुळे झाडांना इजा होणार नाही यांची दक्षता घ्यावी. मॅन्कोझेब अधिक मेटालेक्झील हे संयुक्त बुरशीनाशक २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून पंधरा दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. या उपाययोजनांचा एकात्मीक पद्धतीने अवलंब केल्यास रस शोषण करणाऱ्या पतंगामुळे होणारी फळांची गळ काही प्रमाणात कमी करता येईल.

### फळगळीची महत्त्वाची कारणे

झाडे रोगग्रस्त, कीडग्रस्त, दुखापत झालेली अथवा जास्त वयाचे असणे. झाडामध्ये ऑक्झीन या संजीवकाचे असंतुलन असणे. कर्बःनत्र गुणोत्तरामध्ये असंतुलन. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता व झाडाची उपासमार. पाण्याच्या ताण किंवा अतिरिक्त वापर. तापमानातील चढउतार. ओलिताचे व्यवस्थापन बरोबर नसणे, कमी किंवा आधिक पाण्यामुळे फळझाडांस ताण बसतो त्यामुळे फळ गळण्यास सुरुवात होते. संतुलित पाण्याचा वापर असल्यास फळझाडांवरील फळांना ताण बसत नाही. आंबिया बहाराची फळगळ रस शोषण करणाऱ्या पतंगामुळेसुध्दा होते. या किडीचे प्रौढ पतंग सांयकाळी ७ ते ९ दरम्यानच्या काळात फळांतील रस शोषण करतात. त्या ठिकाणी सुईच्या जाडीचे छिद्र तयार होते. त्यामुळे रोगजंतूना प्रवेश करण्यास मार्ग तयार होतो. रसात साखरेचे प्रमाण असल्यामुळे जंतुची वाढ होते. छिद्राभोवती फळे सडायला लागतात आणि फळे मोठ्या प्रमाणावर गळू लागतात. फळकुज (फायटोप्थोरा) मुळेही मोठ्या प्रमाणात फळांची गळ होते.





# फळबागेत मल्चिंग करणे आवश्यक का आहे?

**पीक उत्पादनात वाढ आणि पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी ठिबक सिंचन फायदेशीर ठरते. ठिबक सिंचनाद्वारे विद्राव्य खतांची शिफारशीत मात्रा देता येते. तसेच अन्नद्रव्ये आणि सिंचनाच्या पाण्याचे व्यवस्थापन करणे सोपे होते. ठिबक सिंचनातून अन्नद्रव्ये आणि पाणी योग्य प्रमाणात पुरवठा होण्यासाठी संचाची वेळोवेळी देखभाल करावी.**

## डबल ड्रीपलाइनचा वापर

- शेतकऱ्याकडून घडणाऱ्या बाबी : आजही शेतकरी फळबागेत झाडाच्या एका बाजूस ड्रीपलाइन किंवा लॅटरलवर ड्रीपर बसवून पाणी आणि खते देतात.
- तांत्रिकदृष्ट्या योग्य बाबी : फळझाडांमध्ये झाडाच्या दोन्ही बाजूंस एकसमान पाणी व अन्नद्रव्ये देण्यासाठी व उत्तम गुणवत्तेचे अधिक फळ उत्पादन मिळवण्यासाठी डबल ड्रीपलाइनचा वापर करणे अतिशय महत्त्वाचे असते.

## ठिबक सिंचनाचा कालावधी

- शेतकऱ्याकडून घडणाऱ्या बाबी : बहुतांश शेतकरी पिकाच्या वाढीची अवस्थेनुसार पाण्याची गरज लक्षात न घेता ठिबक सिंचनाने देखील गरजेपेक्षा जास्त पाणी देतात.
- तांत्रिकदृष्ट्या योग्य बाबी : आपल्याकडे असणारे पीक, आपल्याकडील हवामान परिस्थिती, बाष्पीभवनाचा वेग, पीक वाढीची अवस्था या सर्व बाबींचा विचार करून पिकास आवश्यक तेवढेच पाणी देणे अतिशय जरुरीचे आहे. पिकाच्या गरजेपेक्षा जास्त किंवा कमी पाणी दिल्यास पिकाच्या उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो. यासाठी आपल्या पिकाच्या लागवड तारखेनुसार आणि आपल्याकडील हवामानाचा विचार करून त्याचप्रमाणे आपल्याकडील पंपाचा प्रवाह, बसविलेला ठिबक सिंचन संच, त्याच्यामधून ताशी मिळणारा प्रवाह या सर्व बाबी विचारात घेऊन कंपनीकडून पिकास रोज अथवा एक दिवसाआड किती पाणी द्यावे, संच किती वेळ चालवावा याबद्दलचा तक्ता तयार करून घ्यावा. त्यानुसार ठिबक सिंचन संच चालवावा. साधारणपणे ठोकताळा म्हणून उन्हाळ्यात दरदिवशी ३ तास, हिवाळ्यात २ तास आणि पावसाळ्यात पाऊसमान बघून १ ते १.५ तास ठिबक सिंचन संच चालवावा.

## ठिबक सिंचनाद्वारे खत व्यवस्थापन

- शेतकऱ्याकडून घडणाऱ्या बाबी : शेतकरी आजही सर्व खते ठिबकमधून देत नाहीत. बहुतांश शेतकरी ठिबकमधून फक्त नत्र खत म्हणजे युरिया देतात.
- तांत्रिकदृष्ट्या योग्य बाबी : पाण्यामध्ये विरघळणारी अथवा द्रवरूप खते ठिबकमधून पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार व गरजेप्रमाणे दिल्यास खतांचा कार्यक्षम वापर होतो. खतमात्रेत ३० टक्के बचत होते. नत्रासाठी युरिया, स्फुरदासाठी फॉस्फरिक आम्ल किंवा मोनोअमोनियम फॉस्फेट (१२:६१:०) आणि पालाशसाठी पांढऱ्या रंगाचे म्युरेट ऑफ पोटॅश यांचा वापर करावा. सूक्ष्म अन्नद्रव्ये ठिबक सिंचन पद्धतीतून देणे फायदेशीर आहे. पिकाला दररोज अथवा एकदिवसाआड खते ठिबकमधून देणे खूप फायदेशीर असते. आपल्या पिकासाठी कोणती खते, कधी व किती प्रमाणात द्यावीत याबद्दलचा तक्ता कंपनीकडून तयार करून घ्यावा. त्याप्रमाणेच खते द्यावीत.

## ठिबक सिंचन संचाची देखभाल

- शेतकऱ्याकडून घडणाऱ्या बाबी : बरेच शेतकरी ठिबक सिंचन संचाची देखभाल वेळेवर व योग्य प्रकारे करत नसल्याने ठिबक सिंचनातील ड्रीपर बंद होऊन सर्व ठिकाणी शेतात एकसमान पाणी व अन्नद्रव्ये उपलब्ध न झाल्याने पिकाचे उत्पादन घटते.
- तांत्रिकदृष्ट्या योग्य बाबी : ठिबक सिंचन संच कायमस्वरूपी योग्य दाबावर कार्यक्षमरीत्या चालण्यासाठी देखभाल वेळेवर करावी. जसे, की गाळण यंत्रणा स्वच्छ करणे. मीडिया फिल्टर, स्क्रीन फिल्टर/डिस्क फिल्टर दररोज साफ करावा. ठिबक सिंचन १.५ किलोग्रॅम / सेंमी वर्ग दाबावर चालवावा. लॅटरलच्या शेवटच्या ड्रीपरवर १ किलोग्रॅम / सेंमी वर्ग एवढा दाब असणे जरुरीचे आहे. आठवड्यातून एकदा सबमेनवरील फ्लॅश व्हॉल्व्ह खोलून सबमेन साफ करावी. आठवड्यातून एकदा लॅटरल/लहान जलवाहिन्या शेवटच्या तोंडाचे एन्ड कॅप काढून नेहमीपेक्षा दीडपट ते दुप्पट दाबाच्या पाण्याने फ्लश कराव्यात. सहा महिन्यांनी बंद पडलेल्या तोट्या एक टक्का आम्लाच्या पाण्याने साफ कराव्यात. जैविक कारणाने तोट्या बंद पडल्या असतील तर सहा महिन्यांतून एकदा क्लोरिनची प्रक्रिया करावी. लहान जलवाहिन्यात शेवाळाची वाढ होत असेल तर मोरचुदाची प्रक्रिया करावी. पाण्यामध्ये क्षारांचे प्रमाण जास्त असल्यास आम्ल प्रक्रिया करणे जरुरीचे असते. आम्ल उपचारासाठी सल्फ्युरिक ॲसिड (६५ %), हायड्रोक्लोरिक ॲसिड (३५ %), नायट्रिक ॲसिड (८५ %) फॉस्फरिक ॲसिड (८५ %) यापैकी एका आम्लाचा वापर करावा. जर पाण्यात लोहाचे प्रमाण ०.५ पीपीएमपेक्षा जास्त असेल, तर फॉस्फरिक ॲसिडचा वापर टाळावा.



# राज्यात दहशतवादविरोधी पथकाची कारवाई; उमरखेडसह विविध ठिकाणी मध्यरात्री छापे






**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्यभरात सध्या सुरु असलेल्या एटीएसच्या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे. अशातच विदर्भातील यवतमाळमध्ये पुसद आणि उमरखेडमध्ये १४ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. तर अहिल्यानगरमध्ये ७ ठिकाणी एटीएसचे छापे पडल्याची माहिति आहे. दहशतवादी संघटनांच्या संपर्कात राहून अनेक तरुणांना सक्रिय करण्याच्या हालचाली आढळल्यानंतर एटीएसनं सर्च ऑपरेशन राबवलं आहे. त्या अनुषंगाने अनेक भागात जवळपास २१ ठिकाणी एटीएसचे सकाळपासून सर्च ऑपरेशन सुरु असल्याची माहीती आहे. सोबतच या प्रकरणी अनेकांना ताब्यात घेऊन चौकशी केली जात असल्याची माहिति सूत्रांनी दिली आहे.

राज्यात काल रात्रीपासून अनेक भागात टीएसची गोपनीय कारवाई सुरू आहे. विदर्भातही ४ ते ५ ठिकाणी टीएस पथकाने कारवाई सुरू केली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि पुसद गावात टीएस पथकाची काल रात्रीपासून कारवाई सुरु आहे. तर अकोला जिल्ह्यातील उरळ पोलीस स्टेशनअंतर्गत काही भागातही कारवाई सुरू आहे. एटीएसचे २० पथक हे रात्रीपासून उमरखेड आणि पुसद गावात तळ ठोकून आहे. टीएस प्रमुख चंद्रकिशोर मीणा यांच्या नेतृत्वात विविध पथके तयार करण्यात आले असून राज्यात अनेक ठिकाणी काल रात्रीपासून हे पथके तळ ठोकून आहेत. एकट्या यवतमाळ जिल्ह्यात जवळपास एटीएस २० पथक दाखल आहे. या ठिकाणी स्थानिक पोलिसांसह आयपीएस अधिकारी देखील हजर आहे. त्यामुळे या कारवाईत नेमकं काय घडतं हे पाहणं महत्वचे ठरणार आहे.

अत्यंत गोपनीय पद्धतीनं राज्यातल्या अनेक ठिकाणी एटीएस पथकाकडून चौकशी सुरु आहे. स्थानिक घरांमध्ये जात लोकांकडून चौकशी केल्या जात आहे. मात्र कारवाईत पथकाने अद्यापपर्यंत कुणालाही ताब्यात घेतले नाही, अशी माहिती सूत्रांनी दिलीये. संभाव्य घातपाती कारवायांच्या पार्श्वभूमीवर एटीएससह तपास यंत्रणांनी काल मध्यरात्रीपासून राज्यात बहुतांश जिल्ह्यातीळ विविध परिसरात कारवाईला सुरुवात केलीय. कारवाई सुरू असताना यावेळी मोठा बंदोबस्त ठेवला जात आहे.

## १७ फेब्रुवारीला वर्षातील पहिलं सूर्यग्रहण

**मुंबई (प्रतिनिधी)** – खगोलशास्त्र आणि धार्मिक परंपरांमध्ये रस असणाऱ्यांसाठी २०२६ हे वर्ष विशेष महत्त्वाचं ठरणार आहे. या वर्षातील पहिलं सूर्यग्रहण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलं असून, खगोलप्रेमींमध्ये उत्सुकता वाढली आहे. मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी हे सूर्यग्रहण होणार असून, ते माघ अमावस्येच्या दिवशीच पार पडणार आहे. विशेष म्हणजे हे कंकणाकृती सूर्यग्रहण असणार आहे, ज्यामुळे खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातूनही या घटनेला मोठं महत्त्व आहे.

पंचांगानुसार, सूर्यग्रहणाची सुरुवात दुपारी ३ वाजून २६ मिनिटांनी होईल, तर सायंकाळी ७ वाजून ५७ मिनिटांपर्यंत हे ग्रहण चालू राहील. खगोलतज्ज्ञांच्या माहितीनुसार, हे ग्रहण अंटार्क्टिका, आफ्रिकेतील काही भाग आणि दक्षिण अटलांटिक महासागराच्या परिसरात स्पष्टपणे दिसणार आहे.

## पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे तीन दिवसीय प्रदर्शन व विक्री कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर(प्रतिनिधी)**–भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय अंतर्गत एमएसएमई विकास कार्यालय व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना अंतर्गत तीन दिवसीय प्रदर्शनी व विक्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ही प्रदर्शनी दि. १६ ते १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील पाटीदार भवन, जालना रोड येथे होणार असून, दररोज दुपारी १२.३० ते सायंकाळी ७.०० या वेळेत सर्वांसाठी खुली राहणार आहे.

**कारागीर व शिल्पकारांना सुवर्णसंधी**

या प्रदर्शनात पारंपरिक कारागीर व शिल्पकारांना त्यांच्या वस्तूंचे प्रदर्शन व थेट विक्रीची संधी मिळणार आहे. यात सुतार, अस्त्रनिर्माते, लोहार, सुवर्णकार, कुंभार, मूर्तिकार, मोची, चटई व झाडू निर्माते, बाहुली व खेळणी निर्माते, मालाकार आदींचा सहभाग असणार आहे. तसेच ब्रँड नोंदणी, बौद्धिक संपदा हक्क व त्याचे फायदे याबाबत तीनही दिवस विशेष मार्गदर्शन करण्यात येणार असून स्वयंरोजगार कार्यशाळाही आयोजित केली जाणार आहे.

या कार्यक्रमाला लघु उद्योग भारती, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, मराठवाडा लघु उद्योग विकास संघ, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, सीएसएमएसएस छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आदी संस्थांचे सहकार्य लाभले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन रवींद्र साठे, सभापती, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांच्या हस्ते दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुलकुमार मिश्रा, सहायक संचालक, एमएसएमई विकास कार्यालय असणार आहेत. शेष सहकार्य रुपेश आचारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचे लाभले आहे.

यावेळी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, इंडो जर्मन टूल रूम, नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन आदी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.


सर्व नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन पीएम विश्वकर्मा योजनेतील कारागीर बंधू-भगिनींच्या उद्योगांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## नागपुरातील कोराडी मंदिरात देशातील सर्वात उंच १५८ फूट हनुमान मूर्तीची निर्मिती
### गृहमंत्री अमित शाहांच्या हस्ते होणार लोकार्पण

**नागपूर(प्रतिनिधी)**–नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानच्या परिसरात देशातील सर्वात उंच हनुमान मूर्तीची निर्मिती केली जात आहे. १५८ फूट उंच हनुमानाच्या मूर्तीचे जवळपास ६०% काम पूर्ण झाले असून लवकरच संपूर्ण काम पूर्ण करून देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत या सर्वात उंच मूर्तीचे लोकार्पण केले जाईल, अशी माहिती संस्थानचे अध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे (उहरपवीरीहशज्ञहरी इुरपर्ज्ञीश्रश) यांनी दिली आहे.

नागपूर शहरापासून दक्षिणेस अवघ्या २० किमी अंतरावर असलेले कोराडी महालक्ष्मी जगदंबा मंदिर हे तमाम भाविकांचे शक्तीपीठ आहे.

## प्राचार्य डॉ.वसंत बिरादार यांच्या 'खोल उन्हातली गर्द सावली' कादंबरीला उदगीरच्या रंगकर्मी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर




**अहमदपूर (प्रतिनिधी)**– येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील लिखित 'खोल उन्हातली गर्द सावली' या कादंबरीस उदगीर येथील रंगकर्मी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे.

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांची ऑगस्ट २५ मध्ये 'खोल उन्हातली गर्द सावली' ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली असून, या कादंबरीत वाड्.मयीन मूल्य व जीवनमूल्यांचा एकत्रित आविष्कार झाला आहे. ही कादंबरी जीवन दिग्दर्शक ठरणारी आहे.

या कादंबरीस २०२५ - २०२६ या वर्षाचा उदगीरच्या रंगकर्मी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला असून हा पुरस्कार उदगीर येथे १ मार्च २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार असल्याचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड, उपाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी, मारोती भोसले, महादेव खलुरे, रसूल दा. पठाण, प्रा. रामदास केदार, धनंजय गुडसूरकर आदी मान्यवरांनी कळवले आहे.

साहित्य क्षेत्रातील मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांचे किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीरचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी. टी. शिंदे, उपाध्यक्ष माधवराव पाटील, ज्येष्ठ सदस्य तथा माजी सचिव ज्ञानदेव झोडगे यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले.


VEHICLE FOR SALE

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Vech no | Year | Model |
|---|---|---|
| MH-26-BD-6326 | 2023 | BAJAJ MAXIMA CARGO |
| | | |
| | | |

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before **23/02/2026**. Offer reach after the sold date the company reserve the right to reject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED

IInd Floor, Parmar complex, Bafna T- Point , Nanded 431601

Ph- 8108157969, 8108151742, 8108151741


## Change In Name

My Old Name is ADIL KHAN which now I am changing as New Name AADIL KHAN ARSHAD KHAN Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Address - 1-3-451 Behind Baitul Uloom School Nai Abadi Galli No. 26 Nanded

Mo. 9890311631

## रविनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म.कौठा ता.जि.नांदेड.
## जाहीर प्रगटन

रविनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. मौजे कौठा ता. जि. नांदेड या संस्थेचे भागधारक व विस्तारीत रविनगरमधील प्लॉट नं.०९ चे धारक सभासद श्री लक्ष्मीकांत उध्दवराव गज्जेवार हे आहेत. त्यांनी स्वतः धारण केलेला विस्तारीत रविनगरमधील प्लॉट नं. ०९ हा सौ. आनंदी लक्ष्मीकांत गज्जेवार यांच्या नावावर हस्तांतरीत करण्याकरिता संस्थेत लेखी विनंती अर्ज व आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेली आहेत. त्यावर संस्थेच्या मा. संचालक मंडळाच्या सभेत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे.

विस्तारीत रविनगरमधील प्लॉट नं.०९ ज्याचे एकूण क्षेत्रफळ २४०० चौ. फुट. असून चतु:सिमा पूर्वेस : प्लॉट नं.१०, पश्चिमेस : प्लॉट नं.०८, दक्षिणेस : शिवाजी मंगल कार्यालयाची जागा व उत्तरेस : रस्ता आहे.

वर नमूद चतु:सिमेच्या आतील प्लॉट उक्त माहितीच्या आधारे हस्तांतरीत करणे बाबत कोणाचेही हितसंबंध, सौदाचिठ्ठी, विक्रीपत्र, वहिवाट किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे आक्षेप/उजर असतील किंवा सदरील प्लॉटमध्ये काही हक्क संबंध असल्यास त्यांनी आपला आक्षेप/उजर हे प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून सात दिवसाच्या आत लेखी कागदपत्रासह संस्थेच्या कार्यालयात अथवा संस्थेच्या सचिवाकडे नोंदवावा/सादर करावा. मुदतीत आक्षेप/उजर नाही आल्यास सदरील प्लॉट हस्तांतरणास कोणाचाही कसलाही आक्षेप/उजर नाही असे समजले जाईल, व संस्थेचे संचालक मंडळ सदरील प्लॉटच्या हस्तांतरणाबाबत पुढील कार्यवाही करेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर संस्थेवर बंधनकारक राहणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

सचिव
रविनगर सहकारी गृहनिर्माण
संस्था म. कौठा ता. जि. नांदेड

## शाहूनगर सहकारी कर्मचारी गृहनिर्माण संस्था मर्या. धनेगाव, नादेड, ता. जि. नादेड
## जाहीर प्रगटन

शाहूनगर सहकारी कर्मचारी गृहनिर्माण संस्था मर्या. धनेगाव, नादेड ता.जि. नादेड या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२५-२६ ते २०३०-३१ साठीची प्रारूप मतदान यादी संस्थेचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर येथे लावण्यात आलेली आहे. सदर मतदान यादीवर संस्थेच्या सभासदापैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक १३/०२/२०२६ ते २२/०२/२०२६ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात आक्षेप नोंदवावेत. कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

(संतोष के. सरकटे)
निवडणूक निर्णय अधिकारी
(शाहूनगर सहकारी कर्मचारी
गृहनिर्माण संस्था शाहूनगर
धनेगांव, नांदेड ता. जि. नांदेड
मो. ९७६७१००५५८

अध्यक्ष-सचिव
शाहुनगर सहकारी कर्मचारी गृहनिर्माण संस्था
धनेगाव, नांदेड, ता.जि. नांदेड
मो. ९९२१२६९५०५

## जाहीर प्रगटन नोटीस

जनता बॅकवर्ड क्लास को-ऑपरेटीव्ह हाऊसींग सोसायटी लि. नांदेड पत्ता जनता कॉलनी ता. जि. नांदेड. या संस्थेचे सभासद असलेल्या व संस्थेच्या इमारती/भूखंडावर/गाळा/बंगला/प्लॉट क्र. सी-६९ धारण करणाऱ्या श्रीमती नर्मदा भीमराव कांबळे यांनी संस्थेकडे अर्ज दिला की, त्यांनी आपला वारस यांचे नांवे त्यांचे (सभासदत्व) भाग प्लॉट क्र.सी.६९ हितसंबंध हस्तांतरण करण्यासाठी अर्ज दिला आहे. धारण करणाऱ्या नामनिर्देशन केले नाही. संस्था या नोटीसीद्वारे भांडवलात/मालमत्तेत असलेले सभासदाचे भाग व हित हस्तांतरीत करण्या संबंधी सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ दिवसात आपल्या मागण्याच्या/हरकतीच्या पृष्ठार्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाहीत तर सभासदांचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास /हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून सचिव यांच्याकडे सकाळ/दुपारी ११.०० ते संध्याकाळी ३ पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीसची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

जनता बॅ. क्लास को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी जि. नांदेड यांच्याकरिता आणि वतीने

अध्यक्ष/सचिव
जनता बॅ. क्लास को-ऑपरेटिव्ह
हाऊसिंग सोसायटी लि. नांदेड,

## (जाहीर प्रगटन मार्फत तलाठी सज्जा पोमनाळा)

अर्जदार श्री संजय सुधाकर बिडवई रा. नागापुर ता. भोकर यांनी मौ. नागापुर येथील गट क्र. १९ मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ जमना मोगलाजी सन १९५८-५९ (१००३४) अशी नोंद कमी करणे बाबत विनंती अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.

त्या अनुषंगाने प्रकणात अर्जदार यांनी सादर केलेल्या ७/१२ चे अवलोकन केले असता

नौ.नागापुर येथील गट क्र. २१९ मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ जमना मोगलाजी सन १९५८-५९ (१००३४) अशी कुळाची नोंद असल्याचे दिसुन येते.

करीता याव्दारे मौ. नागापुर येथील गट क्र. २१९ मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ जमना मोगलाजी सन १९५८-५९ (१००३४) किंवा त्यांचे काही वारसदार असल्यास त्यांना सुचित करण्यात येते कि, सदर कुळ कमी करणे बाबत आपला काही आक्षेप अथवा काही सुचना असल्यास आपण आपले म्हणणे १५ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत माझे समक्ष सादर करावेत. उक्त विहीत मुदतीनंत प्राप्त झालेल्या कुठल्याही हरकती/सुचना स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच प्रकरणात सर्व हितसंबंधितांनी आपले लेखी म्हणणे सादर न केल्यास कुठलीही हरकत नसल्याचे गृहीत धरुन प्रकणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(सुरेश घोळवे)**
**तहसीलदार भोकर**

## (जाहीर प्रगटन मार्फत तलाठी सज्जा पोमनाळा)

अर्जदार श्री संतोष सुधाकर बिडवई रा. नागापूर ता. भोकर यांनी मौ. नागापूर येथील गट क्र. ९ मधील इतर अधिकारातील नमूद साधे कुळ जमना मोघाळाजी सन १९५८-५९ चा सा.कु. १०३७) अशी नोंद कमी करणे बाबत विनंती अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.

त्या अनुषंगाने प्रकणात अर्जदार यांनी सादर केलेल्या ७/१२ चे अवलोकन केले असता नागापुर येथील गट क्र. २२९ मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ जमना मोघाळाजी सन ५८-५९ चा सा.कु. (१००३७) अशी कुळाची नोंद असल्याचे दिसुन येते.

करीता याव्दारे मौ. नागापुर येथील गट क्र. २२९ मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ ना मोघाळाजी सन १९५८-५९ चा सा.कु. (१००३७) किंवा त्यांचे काही वारसदार असल्यास त्यांना येत करण्यात येते कि, सदर कुळ कमी करणे बाबत आपला काही आक्षेप अथवा काही सुचना ल्यास आपण आपले म्हणणे १५ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत माझे समक्ष सादर करावेत. त विहीत मुदतीनंत प्राप्त झालेल्या कुठल्याही हरकती/सुचना स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच रणात सर्व हितसंबंधितांनी आपले लेखी म्हणणे सादर न केल्यास कुठलीही हरकत नसल्याचे गृहीत न प्रकणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(सुरेश घोळवे)**
**तहसीलदार भोकर**

## Change In Name

My Old Name is SHAISTA PARVEEN which now I am changing as New Name SHAISTA PARVEEN ARSHAD KHAN Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Address - 1-3-451 Behind Baitul Uloom School Nai Abadi Galli No. 26 Nanded

Mo. 9890311631

## Change In Name

My Old Name is KHAN ARSHAD which now I am changing as New Name ARSHAD KHAN NURULLA KHAN Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Address - 1-3-451 Behind Baitul Uloom School Nai Abadi Galli No. 26 Nanded

Mo. 9890311631

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, VISHNUPURI, NANDED - 431606.**

**Tender No.: Estate/Electrical Materials/Engg.Dept./ET-43-2025**

## E-TENDER NOTICE

The Registrar, S.R.T.M. University, Nanded invites Tender for **"Supply of Electrical Materials for Engineering Department"** from **Manufacturer / Reputed Firm / Distributors / Authorized Dealers** to participate in the competitive bidding process. For the detailed Tender document, interested bidders should visit **https:\\mahatenders.gov.in/www.srtmun.ac.in** The filled tender booklet will be accepted on or **before 04/03/2025 up to 3.00 p.m. The said e-Tender will be online open as per schedule if possible.** Extension of tender, Corrigendum or change in schedule will not be published in News paper; it will be published only at **www.srtmun.ac.in/mahatenders.gov.in** website only.

Ref.: Estate/Electrical Materials/Engg.Dept./ET-43-2025/482
Date: 09/02/2026

**Registrar**

## Change In Name

My Old Name is SHARON PAI which now I am changing as New Name SHARON CHRISTOPHER CHERIMAN Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Address - W/o CHRISTOPHER CHERIMAN PLOT No. 34, KABRANAGAR, TIRUMALANAGAR, TARODA (Bk) NANDED MAHARASHTRA-431605

Mo. 8626070431/9823175907

## Change In Name

My Old Name is PRITY RAHUL SONAWANE which now I am changing as New Name PRITY ANANDRAW WAGH Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Sign By- 1101-ALPINE JOYVILLE HOUSING SOCIETY MAIN ROAD NEAR INFOSYS CIRCLE HINEWADI PHJE-1 MAN PO-INFOTECH PARK (HINJEWADI) DIST. PUNE, MAHARASHTRA-411057

## Change In Name

My Old Name is SUBHASHSINGH PATEL which now I am changing as New Name SUBHASHSINH HARISINH PATEL Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Address - NEAR BALAJI MANDIR, H. NO. 4-5-14, GADIPURA, NANDED-431604

Mo.No. 8888975006

## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.

इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# घरफोडी करणाऱ्या महिलांसह पाच जणांची टोळी जेरबंद; १९ लाखांचा मुद्देमाल जप्त

## गुन्ह्यातील फिर्यादीच निघाली आरोपी; १०० टक्के मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** घरफोडी करणारी टोळी भाग्यनगर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने अटक केली आहे. या टोळीमध्ये तीन महिलांचा समावेश असून अटक केलेल्या पाच जणांकडून १९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख हे आपल्या पथकासह पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन भाग्यनगर नांदेड येथे गुरन ८९/२६ कालम ३३१ (३), ३३१ (४), ३०५ (अ), २१७ बी.एन.एस. प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल होता. विनोद देशमुख व अंमलदार आरोपींचा शोध घेत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदर घरफोडीतील आरोपी हे तुळजापूर येथे गेले आहेत, अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन सदरची माहिती वरिष्ठांना देवून सदर आरोपींचा शोध सायबर सेल यांच्या मार्फतीने तांत्रीक पद्धतीने घेत तुळजापूर येथे नमूद पथक गेले असता तुळजापूर देवस्थानाच्या बाहेर सार्वजनिक रोडवर दोन पुरुष व तीन महिला गोपनीय बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाप्रमाणे दिसून आल्याने त्यांना ताब्यात घेतले. त्या सर्वांना विश्वासात घेवून सदर गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केली असता संभाजीनगर, कॅनॉल रोड, नांदेड येथील फिर्यादीचे घरी नमूद ५ जणांनी संगणमत करून घर फोडल्याचे सांगून गुन्ह्यातील सोन्या-चांदीचे, बेन्टेक्सचे दागीने व हातातील घड्याळ चोरल्याचे कबूल केले. मात्र गुन्ह्यातील चोरी गेलेले १२ लाख ५० हजार रुपये चोरुन नेले नाही, असे आरोपी सांगत असल्याने आरोपी व फिर्यादी यांना क्रॉस चेक केले असता फिर्यादीने सदरचे पैसे हे तिची आई विमलबाई लंकनवाड रा. ब्राम्हणगाव ता. उमरखेड, जि. यवतमाळ हिचे घरी यापूर्वीच नेवून ठेवलेले तपासात निष्पन्न झाले. गुन्ह्याचे तपासात सदरचे पैसे फिर्यादीचे आईकडून जप्त केले आहेत. यातील फिर्यादीने १२ लाख ५० हजार रुपये चोरुन घेवुन गेल्याचा बनाव केल्याचे निष्पन्न झाल्याने फिर्यादी मंगल पोशेट्टी जंगिलवाड (वय ४० वर्ष रा. कासराळी ता. बिलोली जि. नांदेड ह. मु. संभाजीनगर कॅनाल रोड नांदेड) यांना गुन्ह्यात आरोपी करून कलम २१७ BNS प्रमाणे सदर गुन्ह्यामध्ये कलम वाढ करण्यात आली आहे. गुन्ह्यातील गेला माल १०० टक्के मिळाल्याने तो जप्त करण्यात आला असून नमूद गुन्ह्याचा अधिक तपास पोउपनी विनोद देशमुख हे करत आहेत.

पथकाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, सहाय्यक पोलीस अधीक्षक शशांथ गौडा, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने आणि पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी कौतुक केले आहे.

# भाजपकडून लोकशाही संपविण्याचे प्रयत्न –खा. रवींद्र चव्हाण

## काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचे जोरदार स्वागत करत नांदेडात आणू




**नांदेड (प्रतिनिधी)–** देशभरात भाजपाकडून दडपशाही सुरू असून, संसदेत विरोधी पक्ष नेत्यांना बोलू दिले जात नाही. जेफ्री एप्स्टीन फाईल संदर्भातील नैतिक जबाबदारी घेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा द्यायला हवा, पण त्यांनी फाईल दाबण्यासाठी शेतकऱ्यांचे नुकसान करणारा अमेरिकेसोबत करार केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावून भाजपा दिशाभूल करत आहे. नांदेडमध्ये काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांना येऊ देणार नाही, असे वक्तव्य केले जात आहे, पण आम्ही जोरदार स्वागत करत प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना नांदेडात आणू, असा जोरदार प्रतिवार खासदार रवींद्र चव्हाण यांनी केला.

शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने भाजपा सरकारच्या चुकीच्या धोरणा विरोधात निषेधासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजीनाम्याची मागणी करत सोमवार, दि. १६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयापुढे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी खा. रवींद्र चव्हाण, ओबीसी विभाग प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे, दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, प्रदेश सरचिटणीस डॉ. श्रावण रॅपनवाड, डॉ. रेखा चव्हाण, श्याम दरक, आनंद चव्हाण, केदार पाटील साळुंखे, महेश देशमुख तरोडेकर, रमेश चित्ते, अनिल मोरे, नगरसेवक सत्यपाल सावंत, विठ्ठल पावडे, गोविंदबाबा गौड, श्रीनिवास मोरे, कुमार कुर्तडीकर, बालाजी चव्हाण, मुन्ना अब्बास, अजिज कुरेशी, संदीप देशमुख, प्रताप देशमुख, बापूसाहेब पाटील, आनंदा गुडले, सुनील पवार, विलास पावडे, ललिता कुंभार, ज्योती कदम, जेशिका शिंदे, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, गोविंद पाटील, किरण पडलवार, सुभाष लोणे, विलास पावडे, भगवान कदम, अभिलाष पावडे, अझर शेख आदींसह इतर काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते.

# क्षुल्लक वादातून १६ वर्षीय मुलाची हत्या, ३ अल्पवयीन मुलांना घेतले ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** केवळ 'भाईगिरी' आणि वर्चस्वाच्या वादातून एका १६ वर्षीय मुलाची हत्या तीन अल्पवयीन मुलाने केल्याची खळबळजनक घटना नांदेडमध्ये घडली आहे. गोवर्धनघाट पुलाजवळ झालेल्या कमलप्रीतसिंग उर्फ प्रिन्स खालसा (वय १६) याच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत तीन अल्पवयीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. मारेकरी नायगावकडे पळून जात असताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या पथकाने अटक केली.

ही घटना रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास घडली. किरकोळ वादाचे रूपांतर मोठ्या संघर्षात झाले आणि या अल्पवयीन मुलांनी कमलप्रीतची निर्घृण हत्या केली. हत्येनंतर आरोपी फरार झाले होते, मात्र पोलिसांनी तत्परता दाखवत नायगाव रोडच्या दिशेने पळून जाणाऱ्या तिघांनाही घेराबंदी करून ताब्यात घेतले.

पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली आहे. मृत कमलप्रीत आणि आरोपींमध्ये सुमारे ८ दिवसांपूर्वी कोणत्या तरी कारणावरून कडाक्याचे भांडण झाले होते. मनात हीच जुनी अद्दल आणि सूडभावना ठेवून या मुलांनी रविवारी या खुनी खेळाचा कट रचला आणि अंमलबजावणी केली.

वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी या प्रकरणाला दुजोरा दिला असून पालकांसाठी एक गंभीर इशाराही दिला आहे. त्यांनी 'गोदातीर समाचारशी' बोलताना सांगितले की, आजकालची तरुण मुले 'भाईगिरी'च्या खोट्या वर्चस्वाखाली आणि सोशल मीडियाच्या प्रभावाखाली गुन्हेगारीकडे वळत आहेत. पालकांनी आपल्या मुलांच्या हालचाली, त्यांची संगत आणि ते कोणासोबत फिरतात यावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मुलांना गुन्हेगारीच्या गर्तेतून वाचवण्यासाठी पालकांचा संवाद आणि सतर्कता अत्यंत महत्त्वाची आहे, असे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी सांगितले

# नांदेड जिल्ह्यात सामूहिक छापे; साडेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त, ७२ जणांवर गुन्हे दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक छापे करण्यात आले. या अंतर्गत ७२ जणांविरुद्ध ६४ गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईत ८ लाख २९ हजार ९०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड परिक्षेत्रातील अवैध धंदे बंद करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या विशेष पथकाकडून कारवाई केली जात आहे. तर दुसरीकडे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम राबविण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी उमाप यांच्या पथकाकडून वाळू व जुगार माफियांवर मोठी कारवाई झाली होती. यानंतर ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत जिल्ह्यात शनिवारी एकाच दिवशी अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती तसेच विक्री करणाऱ्यांविरुद्ध, अवैध जुगार खेळणाऱ्या विरुद्ध आणि अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यावर मासरेड टाकून कारवाई करण्यात आली.

देशी दारू, हातभट्टी दारूची विक्री वेगवेगळ्या ठिकाणी लपून-छपून केली जाते. त्याचवेळी आता एका किराणा दुकानात पोलिसांनी छापा मारून देशी दारूची विक्री होत असल्याचे उघड केले आहे. जिल्ह्यात सीमावर्ती भागासह अनेक ठिकाणी क्लबच्या नावाखाली जुगार अड्डे सुरू आहेत. या जुगारांना फाईव्ह स्टार सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे नांदेड जिल्ह्यासह परराज्यातील जुगारीही नांदेडमधील बिलोली, धर्माबाद, उमरी या भागात जुगार खेळण्यासाठी येत आहेत. यात लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. सततच्या कारवाईनंतरसुद्धा जिल्हाभरात अवैध रेती उपसा होत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येत आहे.

# बांधकाम कामगार समितीच्या अध्यक्षपदी आ. बोंढारकर तर सहअध्यक्षपदी गोविंदराव पुयड पाटील यांची निवड

**मुखेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या कामगार मंत्रालयाकडून गठीत करण्यात आलेल्या बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समिती नांदेड (दक्षिण) च्या अध्यक्षपदी आ. आनंद शंकर तिडके बोंढारकर तर सहअध्यक्षपदी गोविंदराव पुयड पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने ८७ नांदेड (दक्षिण) मतदारसंघासाठी विशेष संनियंत्रण समिती गठीत केली आहे. या समितीचा मुख्य उद्देश बांधकाम कामगारांच्या हक्क, सुविधा आणि कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे हा आहे. या समितीवर नव्याने सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या रोजगार व सेवाशर्तीचे नियमन करण्यासाठी व त्यांच्या सुरक्षा, आरोग्य व कल्याणासाठी उपाययोजना करण्याकरीता व नांदेड (दक्षिण) मतदारसंघासाठी सनियंत्रण समितीची स्थापनाच्या माध्यमातून स्थानिक कामगारांचे प्रश्न सोडवले जातील. या निवडीबद्दल सेवानिवृत्त प्राचार्य बी. वाय. मोरे यांनी अभिनंदन केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक कामास नूतन महापौरांनी दिली भेट

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या महापौर कविता संतोष मुळे यांनी शहरातील माता गुजरीजी विसावा उद्यान परिसरात उभारण्यात येत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाच्या कामाला भेट देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पूर्णाकृती ब्रॉन्झ मूर्ती बसवण्यात येणार आहे. या स्मारकासाठीची मुख्य मूर्ती घडवण्याची जबाबदारी प्रख्यात मूर्तिकार पद्मभूषण राम सुतार यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. महापौरांनी स्मारकाच्या



चौथऱ्याचे बांधकाम आणि परिसरातील सुशोभीकरणाच्या कामाची पाहणी केली. हे स्मारक राजमाता अहिल्यादेवींच्या सेवाभाव, न्यायप्रियता आणि लोककल्याणकारी नेतृत्वाची आठवण करून देणारे ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सदरील कामाची किंमत १० कोटी असून यास शासनाची मान्यता प्राप्त आहे. कामाचे कंत्राटदार एल अँड एस कन्स्ट्रक्शन नांदेड यांना देण्यात आले असून सद्यस्थिती काम प्रगतिपथावर आहे. स्मारकाचे काम विहित वेळेत आणि उच्च गुणवत्तेसह पूर्ण करण्याचे निर्देश महापौरांनी संबंधित कंत्राटदार व मनपाच्या अभियंत्यांना दिले. याप्रसंगी महानगरपालिकेचे सभागृह नेते महेश कनकदंडे, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, शहर अभियंता सुमंत पाटील, उपअभियंता खुशाल कदम, कनिष्ठ अभियंता सुप्रिया मुलंगे यांची उपस्थिती होती.

# त्रिंबक पांडे सोडेगावकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** पीपल्स हायस्कूल येथील सेवानिवृत्त शिक्षक त्रिंबक शंकरराव पांडे सोडेगावकर यांचे दि. १६ फेब्रुवारी रोजी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर नांदेड येथे सायंकाळी शांतीधाम गोवर्धन घाट येथे अत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात २ मुले, ३ मुली, जावाई, नातू, पणतू असा परिवार आहे. त्रिंबक पांडे सोडेगावकर हे ज्येष्ठ चित्रकार होते. नांदेड महानगरपालिकेचा प्रथम लोगो त्यांनी तयार केला होता.

# महाशिवरात्रीनिमित्त विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिरात भाविकांनी घेतले दर्शन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महाशिवरात्रीनिमित्ताने काळेश्वर महादेव मंदिर येथील पंचक्रोशीतील लाखो भाविक-भक्तांनी हर हर महादेवाच्या जयघोषामध्ये दर्शन घेतले. यावेळी ग्रामपंचायत व गावकऱ्यांनी दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भाविक-भक्तांसाठी भाविक-भक्तांसाठी चहा-फराळ, पिण्याचे पाण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती. यावेळी काळेश्वर मंदिरात हजारो भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाशिवरात्रीनिमित्त १५ फेब्रुवारी पहाटे विश्वस्त मंडळ अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या हस्ते विधीवत पूजा झाली. त्यानंतर भाविकांसाठी दर्शन खुले करण्यात आले. रात्रीपासूनच हर हर महादेव, बम बम भोले यासह महादेव नामाचा गजर करत भाविक दर्शन घेत होते. तर विष्णुपुरी गावात दुर्तफा स्वागतासाठी अनेक ठिकाणी विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व सामाजिक संघटना यांच्याकडून स्वागत करणारे बॅनर लावण्यात आले असून, ग्रामपंचायत कार्यालयाकडून दिवाबत्ती, रस्ता, स्वच्छता करण्यात आली होती.

महाशिवरात्री निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिलामृत पारायण सोहळ्याचे आयोजन ९ ते १६ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले होते. तसेच दैनंदिन विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. १६ फेब्रुवारी रोजी हभप राम महाराज सुगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता करण्यात आली. सप्ताह प्रमुख उध्दव हंबर्डे यांच्या नियोजनाखाली यशस्वीरित्या संपन्न झाला.

यावेळी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गोदावरी नदीच्या काठावर जीवरक्षक दल यांच्यासह पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

महाशिवरात्री निमित्ताने जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, उपाध्यक्ष अमिताभाभी चव्हाण,आ. आनंदराव पाटील बोढारकर,भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे, ऊपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे, ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे, यांच्या सह ग्रामपंचायत सदस्य व गावातील विविध राजकीय पक्षांच्ये पदाधिकारी यांनी दर्शन घेऊन भाविक भक्तांच्या दर्शनासाठी सहकार्य केले.

# शस्त्राचा धाक दाखवून जबरी चोरी आणि घरफोडी करणारी टोळी जेरबंद

## दोन लाखांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** पिस्तूलसारख्या घातक शस्त्रांचा धाक दाखवत जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी जबरी चोरी आणि घरफोडी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या हाती लागली. पोलिसांनी टोळीतील तीन चोरट्यांना पकडले. त्यांच्याकडून पिस्तूलसह दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई रविवार, दिनांक १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली.

रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांचे पथक हे जिल्ह्यातील माली गुन्ह्यातील सशंयीत आरोपींचा शोध घेवुन गुन्हे उघड करण्यासाठी नांदेड शहरातील हातोडा चौक परिसरात गस्त करत होते.

पुयड यांना माहिती मिळाली की, तीनजण दोन विना नंबर प्लेटच्या दुचाकीवरुन चोरीच्या गुन्ह्यातील माल विक्री करण्यासाठी आसना टी पॉईट ते तरोडा गावाकडे जाणाऱ्या शिव रोडवर ज्वारी व हळदीच्या शेताजवळ थांबलेले आहेत. माहितीच्या आधारे सापळा रचून तिन्ही संशयीतांना ताब्यात घेतले. त्यात सय्यद उमर सय्यद फारुख (वय २२ रा. लेबर कॉलनी नांदेड), मोहम्मद एजाज ऊर्फ बॅनेट मोहम्मद अकबर (वय ३५ वर्ष रा. ईस्लामपुरा नांदेड) आणि सय्यद अब्बु तलहा ऊर्फ तलहा पाटी सय्यद रहीम (वय २६ रा. मगदुमनगर नईआबादी शिवाजीनगर नांदेड) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यात एक गावठी पिस्तुल, सोन्याचे दागिने, एक लोखंडी खंजर, दोन मोबाईल, नगदी ३५ हजार रुपये आणि दोन दुचाकी असा मुद्देमाल जप्त केला. मागील काही महिन्यांपासून नांदेड शहरात त्यांच्या साथीदारासोबत श्रीनगर येथून एक यूनिकॉर्न दुचाकी चोरी करुन त्याव्दारे माळटेकडी ब्रिज जवळ एका जीपला अडवून त्यामधील प्रवांशाना खंजरचा धाक दाखवून त्यांच्या कडुन सोन्याचे दागिने, ३ मोबाईलची जबरी चोरी केली. तसेच अंबिकानगर येथुन पुन्हा एक पल्सर दुचाकी चोरी करुन त्याव्दारे गणी कॉलनी येथे रात्रीच्या वेळी घरफोडी करुन सोन्याचे दागिने चोरी केले. त्यांनतर हदगांव येथे रात्रीच्या वेळी घरफोडी करुन घरातील नगदी रुपये चोरी केले आहेत असे पकडलेल्या चोरट्यांनी पोलिसांना सांगितले.

नांदेड जिल्ह्यातील अभिलेखाची पाहणी केली असता वरीलप्रमाणे गंभीर गुन्हे दाखल असल्याबाबत माहिती मिळाली. तिन्ही आरोपी व त्यांच्या ईतर साथिदारांनी संगणमत करुन वरील गुन्हे केल्याची खात्री झाली असून उर्वरीत ५ आरोपी बाबत अधिक तपास सुरु आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com